म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ११३५
REFBK-0019528
REFBK-0019528

कुंदकथा

REFBK-0019528

REFBK-0019528

विषय काव्य
सं. नं. ११३५.

# [क]विताक्रम

( १ ) गरीबाची श्रीमंती ... ... ... ... १
( २ ) कां हताश होशी नरा ! ... ... ... २
( ३ ) आत्मविकास ... ... ... ... ४
( ४ ) अद्भूत लपस्वी ... ... ... ... ६
( ५ ) सुनीता ... ... ... ... ७
( ६ ) बालिश शंका ... ... ... ... ९
( ७ ) गोफणवाला ... ... ... ... १०
( ८ ) सतीचें भ्रमण ... ... ... ... १२
( ९ ) राखरांगोळी ... ... ... ... १४
(१०) विमानांतून ... ... ... ... १५
(११) विरही ओहळ ... ... ... ... १७
(१२) जग हें असेंच ! ... ... ... ... १९
(१३) चिमण्या कावळे ... ... ... ... २०
(१४) खेड्यांतली हिरकणी ... ... ... ... २२
(१५) विरहमाधुरी ... ... ... ... २३
(१६) ओला दुष्काळ ... ... ... ... २४
(१७) लाडकी ललना ... ... ... ... २७
(१८) गुलाब गेन्द ... ... ... ... २९
(१९) नृपप्रशस्ति ... ... ... ... ३०
(२०) मोळीवाला ... ... ... ... ३२
(२१) शिवस्मारक पाहून ... ... ... ... ३३
(२२) बरी पडली तुमचीच त्याजहून ... ३४
(२३) अशी वधू हवी ! ... ... ... ... ३५
(२४) प्रेमाची वाट ... ... ... ... ३७
(२५) लौकिक ... ... ... ... ४१

१९५२८

(२६) सुगी ... ... ... ... ४३
(२७) फेरफटका ... ... ... ... ४५
(२८) राजशाही मेजवानी ... ... ... ... ४७
(२९) कॉलेजराणी ... ... ... ... ५०
(३०) राजदरबार गीत ... ... ... ... ५२
(३१) मी असाच ठीक ! ... ... ... ... ५४
(३२) गाडीवान स्त्री ... ... ... ... ५५
(३३) भाव तेथें देव ... ... ... ... ५६
(३४) भिकाऱ्याची कर्मकथा ... ... ... ५७
(३५) गौरव-गीत ... ... ... ... ६०
(३६) तळमळ ... ... ... ... ६२
(३७) शेत्याची शीळ ... ... ... ... ६३
(३८) विरही ... ... ... ... ६५
(३९) गोड आचंवा ... ... ... ... ६७
(४०) मधु वञ्चना ... ... ... ... ७०
(४१) दोन आळशी ... ... ... ... ७१
(४२) तानाजीचा संताप ... ... ... ... ७३
(४३) मागणी ... ... ... ... ७४
(४४) अभयदान ... ... ... ... ७५
(४५) गुर्जरसूर्यास्त ... ... ... ... ७६
(४६) मानससंक्रमण ... ... ... ... ७९

# उमलण्यापूर्वीं

काव्यप्रान्तांत पाऊल टाकून मला उणींपुरीं नऊ वर्षें लोटलीं. या नऊ वर्षांतील अमदानीचा हा कवितासंग्रह आज हातावेगळा होत आहे. अशा वेळीं कण्वमुनींची दुःखानंद मिश्रित मनःस्थिति न अनुभवीत बसतां, या ' कुंदकळया ' रसिकांकडे पोहोंचविण्यांत ज्यांचें मला सहाय्य झालें त्यांचा इथें उल्लेख करणें अवश्य आहे.

गुणग्राही श्री. राजरत्न रा. शा. माने पाटील यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन, जो अर्थभरित अभिप्राय लिहून दिला त्याबद्दल मी त्यांचा सदा ऋणी राहील. तद्वत मध्यवर्ति पुस्तकालयाचे व्यवस्थापक श्री. त्र्यं. दि. वाकनीस यांनीं माझें हस्तलिखित आस्थेवाईकपणानें तपासून मला ज्या बहूमोल सूचना केल्या, त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

गु. प्रा. वि. पां. दांडेकर यांनीं शीर्षकासबंधीं दाखविलेलें औचित्य, श्री. ग. ल. ठोकळ यांनीं कवितांची केलेली कलात्मक छाननी व जागृतिकार श्री. भ. ब. पाळेकर यांनीं प्रकाशनास दिलेली चालना हें त्यांचें सहाय्य निःसंशय प्रशंसनीय आहे.

याशिवाय जे मित्र माझ्या कवितेवर व माझ्यावर आजपर्यंत निर्हेतुक प्रेम करात आले, व ज्यांच्या सलगीशिवाय कदाचित हें प्रकाशन नजरेस आलें नसतें, त्यांचीं इथें केवळ नांवें देऊन औपचारिक आभार मानून मोकळे होण्याची चूक मी कधीं करणार नाहीं. ते माझ्या हृन्मंदिराच्या पायाचे दगड म्हणून गुपितच राहतील.

शेवटीं ' कुंदकळया ' उमलविणारे श्री. जयवन्त जगताप यांचे परिश्रम अभिनंदनीय असून त्यांचें रसिकांनीं सक्रीय कौतुक केल्यास माझा आनंद द्विगुणित होईल हें सांगावयास नकोच.

— सुरेश

# चरित्ररेखा

निसर्गगाभाऱ्यांत विस्तरलेल्या आपल्या शेताच्या टेकडीवरील वृक्षशाखेवर निवान्त बसून—

**सुटला वारा, उडति पांखरें पीक थरथरे ऽऽ**

असें जें मनांत येईल तें हातवारे करीत गाणारा शैशवांतील मनमौजी मुलगा, भविष्यकालीं कवि म्हणून नांवाजेल, हें कुणाच्या स्वप्नींहि नसेल. मनुष्य-जन्माबरोबर त्याची कर्तबगारीही जन्म घेते असें म्हणतात. मात्र तेव्हां ती सुप्तावस्थेंत असते इतकेंच काय ते. तिचें मूर्त स्वरूप काळान्तरानें दिसूं लागते. तें एकदम दिसत नाहीं म्हणूनच मनुष्य 'कर्मणो गहना गतिः' असें मतिकुण्ठित होऊन म्हणतो. अशा वेळीं पदरीं पडलेला भूतकाळ चाळूनच त्याला एकाद्या व्यक्तिविषयीं कांहीं ठाम विचार व्यक्त करतां येणें शक्य असतें.

पूर्व खानदेशांतील पाचोरें तालुक्यांत नेरी या खेडेगांवीं, ता. १३ ऑगष्ट सन १९०८ रोजीं कवि सुरेश यांचा जन्म झाला. सन १९१८ सालीं प्रसिद्ध 'ग्रेट एन्फ्लुएन्झा' मध्यें त्यांच्या घरचीं सारीं माणसें मृत्युमुखीं पडलीं. मानवी हृदयास कंपायमान करणारा दैवी कोप कसा तरी सहन करीत ते जमीनजुमला सावकारांस फेडीस लावून, गावसगृहीं शिक्षणासाठीं येऊन राहिले. तिथें त्यांनीं मराठी पांचवी पास केली व नंतर मॅट्रिकपर्यंत शिक्षण पाचोरें, जळगांव व अमळनेर येथील हायस्कूलांमधून घेतलें.

हायस्कूल-जीवनांत त्यांच्या अंगीं काव्यगुण असल्याचा कुणासही सुगावा नव्हता. ल्हान मुलें वाळूंत घरें बांधतात व जरा मजा मारल्यावर मोडून टाकतात. तद्वतच या काळांत ते कविता रचीत व जरा वेळ तिचा आस्वाद चाखून ती चुरगळून फेकून देत असत. त्यांचा हा प्रकार, परीक्षेस बसण्यापूर्वी पाटीवर गणितें सोडवून, मनाला उत्तरें पटतांच तीं पुसून टाकण्यासारखा होता.

सन १९३० सालीं प्रवेशपरीक्षा पास झाल्यानंतर ते बडोद्यास कलाभवनामध्यें एम्. ई. चा अभ्यास करण्यासाठीं आले. परंतु इथें कविवर्यांचें मन फारसें रमलेलें

दिसत नाहीं. कारण वर्षाखेरीस त्यांनीं हा क्रम सोडून दिला. नंतर त्यांचा कल कॉलेजशिक्षणाकडे वळला. परंतु आर्थिक टंचाईमुळें याचीही शक्यता त्यांना दिसली नाहीं. म्हणून त्यांनीं पोलीस खात्यांत आपली निवड करून घेतली. ट्रेनिंगचे दोन तास सोडून इतर वेळ ते वसतिगृहांत राहून ललित वाङ्मय-वाचनांत घालवीत असत. याच वेळीं त्यांनीं 'गोफणवाला' व 'ओला दुष्काळ' या दोन उत्कृष्ट जानपद कविता रचल्या. ही त्यांची पहिलीच काव्यनिर्मिती होय. या दोन कवितांनीं पुढें त्यांना उत्तम प्रसिद्धी मिळवून देऊन त्यांचा जीवनमार्गही वळविला. साहित्यसम्राट श्री. न. चिं. केळकर यांना या कविता अत्यन्त आवडून, सन १९३२ सालीं बडोदें वाङ्मय परिषदेंत त्यांनीं कवि सुरेश यांना रौप्यपदक देऊन त्यांचा गुणगौरव केला.

या प्रसंगानें गुणग्राही श्री. राजरत्न रा. शा. माने पाटील याचें लक्ष त्यांच्याकडे वेधलें गेलें. कै. पुण्यश्लोक **श्रीमंत सयाजीराव महाराज** यांचे बरोबर विलायतेंत असतांना त्यांनीं कवि सुरेश यांची हकीगत श्रीमंतांना निवेदन केली. श्रीमंतांनीं अत्यन्त कृपावन्त होऊन, उदार अंतःकरणानें त्यांना, त्यांच्या काव्यगुणाचा विकास व्हावा म्हणून; दरमहा रु. ३० ची खास शिष्यवृत्ति कॉलेजशिक्षणासाठीं मंजुर केल्याचा वृत्तान्त तारेनें कळविला. या बहुमोल राजाश्रयामुळें त्यांच्या जीवनाला एक मोठी महत्त्वाची कलाटणी मिळाली.

यांनीं राजदरबारांत अनेक शुभ प्रसंगीं कवितागायन केलें आहे. कै. श्रीमंत सयाजीराव महाराज हे श्री. रा. शा. माने पाटील यांचे घरीं ता. ८।३।३८ रोजीं अल्पोपहारासाठीं आले असतांना, कविराजांनीं 'नृपप्रशस्ति' ही कविता म्हटली होती. या वेळेस श्रीमंतांनीं अत्यन्त खूष होऊन त्यांची शिक्षणासंबंधीं बरीच विचारपूस केली होती. **श्रीमंत सरकार प्रतापसिंह महाराज** यांचे वाढदिवसानिमित्त 'श्रीमंत-प्रशस्ति' ही कविताही ता. ११।१।४१ च्या दरबारांत यशस्वी ठरली.

सन १९३९ मध्यें बी. ए. पास झाल्यानंतर सरकारानें त्यांची बडोदें मध्यवर्ति पुस्तकालय खात्यांत, मराठी अध्ययन विभागाचे ग्रन्थपाल म्हणून नेमणूक केली आहे.

सारांश, कवि सुरेश यांनीं अनेक स्थित्यंतरांतून जाऊन अतांशी स्थैर्य मिळविलें आहे. ' गवता ऐशी उदंड ' कविता निर्माण करून ती मिळेल त्या मासिकांतून प्रसिद्ध करण्याच्या भानगडींत ते कधींच पडले नाहींत. त्यांनीं स्वतः एकाही संपादकास आजपर्यंत कवितेचें पाकीट पाठविलें नाहीं. प्रसिद्धीच्या दृष्टीनें त्यांची ही प्रवृत्ति अवगुणाचीच होय. मनाविरुद्ध बंड पुकारून उठल्या बसल्या कविता करण्याच्या ते अगदीं विरुद्ध आहेत. या बाबतींत " भावाविना भजन नि भूकेविना भोजन " कधीं करूं नये असें ते म्हणतात. बडोद्यातील एकूण दहा वर्षांच्या कारकीर्दींत त्यांनीं आपली काव्यलता मांडवावर बरीच उंच चढविलेली दिसते. आज त्यांनीं तिच्या मधु '**कुंदकळया**' प्रेमळ भावानें प्रकाशकाच्या ओंजळींत घातल्या आहेत. प्रकाशकानें पण त्या उमलवून रसिकांना सादर केल्या आहेत. ते त्यांचा सुगंध सेवून तुष्टतेची भावना व्यक्त करतील अशी आशा आहे.

# — प्रस्तावना —

"वत्सला साहित्य प्रकाशन" मालेमार्फत कवि सुरेश यांचा "कुंदकळया" या नांवाचा कवितासंग्रह प्रकाशित होणार असल्यानें मालेचे संपादक श्री. जयवन्त जगताप यांनीं सदरहू पुस्तकास प्रस्तावना देण्याची मला विनंती केली. वत्सला साहित्य प्रकाशन ही संस्था बहुजन समाजाच्या वाङ्मयीन उन्नतीस्तव स्थापन झाली असून तिच्या मार्फत गेल्या तीन वर्षांत कर्मवीर महर्षि अण्णासाहेब शिंदे यांचें "माझ्या आठवणी" या नांवाचें आत्मचरित्र, सौ. आनंदीबाई शिर्के यांचा "जुईच्या कळया" हा कथासंग्रह, श्री. बाबुराव जगताप यांच्या "टॉलस्टॉयच्या आठ गोष्टी" यासारखीं पुस्तकें बाहेर पडलीं असून कांहीं कांही पुस्तकास श्रीमंत खासेसाहेब महाराज पवार, श्रीमंत यशवंतराव महाराज घोरपडे, ना. अ. बा. लठ्ठे, ना. भास्करराव जाधव इत्यादींनीं प्रस्तावना लिहिल्या आहेत. अशा ध्येयनिष्ठ व कार्येच्छु प्रकाशन संस्थेमार्फत बाहेर पडणाऱ्या पुस्तकास प्रस्तावना नाकारण्याचें जीवावर आले. शिवाय "सुगी", "छंदोरचना" आणि कांहीं नियतकालिकें यांमधून परिचित झालेल्या उदयोन्मुख कवीच्या एकत्रित केलेल्या काव्यसंग्रहास प्रस्तावना देऊन त्याचा गौरव करणें आणि त्यास भूषविणें जरूर वाटले.

कवि सुरेश यांनीं सदर कवितासंग्रहांत एकूण ४६ कविता निवडलेल्या आहेत. ठोकळ मानानें त्याचें जर वर्गीकरण केलें तर शृंगारिक, ग्रामीण, वेदांतपर, विनोदी व राष्ट्रीय भावनात्मक अशा पांच विभागात त्यांचा समावेश होतो. यामध्यें ग्रामीण जीवनावर लिहिलेल्या व विनोदास्तव लिहिलेल्या कविता विशेष सरस वाटतात. स्वतः कवि जरी नौकरीच्या निमित्तानें शहरांत रहात असले तरी त्यांची सुरवातीची २०।२२ वर्षे खेड्यांतच गेलीं असल्यानें जानपद जीवन त्यांच्यांत मुरलेलें दिसतें. प्रत्यक्ष ग्रामीण जीवन अनुभविलें व अवलोकिलें असल्यानें त्या विषयावर रचलेल्या कवितांत अर्थातच जिवंतपणा व जिव्हाळा आला आहे. त्यांचे मित्र कवि ग. ल. ठोकळ यांच्या काव्याची छाप त्यांचेवर पडली असावी असें वाटतें. अनुभवाचें गांठोडे हाताशीं असल्यावर ओळखीचा प्रदेश हिंडतांना सहजसुलभ, रम्य आणि अर्थयुक्त कल्पना सुचणें अगदीं स्वाभाविक आहे. उदाहरणार्थ —

टरटरा निघाले कणिस पोगऱ्यांतुन
वर झुललं फुल्लर पिवळं हळदीहुन
जणुं किसुन फेकलं सोनं देवाजिनं ( —' सुगी ')

... ... ...

हे यांत्रिक सांगाडेच मजशिं भासती ( —' विमानांतून ')

... ... ...

पडदा सारुन हळुंच बाजूला कमळा काढी मान
निसर्गांतलं फूल कुंपणावरलं झुकलं छान ! ( —' प्रेमाची वाट ')

... ... ...

याप्रमाणें अनेक उल्लेखनीय ओळी जातिवंत कवीस साजेशा झाल्या आहेत. अशा कल्पनामय अन् अर्थमय कवितांत ' ओला दुष्काळ ', ' प्रेमाची वाट ', ' राखरांगोळी ', ' विमानांतून ' व ' विरहि ओहोळ ' या पांच कवितांचा प्रामुख्यानें अन्तर्भाव करावा लागेल. किंबहुना सर्व संग्रहांत पांच कविता सर्व दृष्टीनें सरस ठरतात. या वर उध्दृत केलेल्या पांच कवितामुळें कवि सुरेश प्रसिद्धीस येतील अशी आशा करावयास भरपूर जागा आहे.

अर्थात सर्वच गोष्टी सर्वगुणसंपन्न असूं शकत नाहींत या न्यायानें याही कवितासंग्रहांत अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, ज्यामुळें संग्रह डागळला आहे. विषयवैचित्र्याच्या फाजील भरीस पडल्याने कित्येक सामान्य व नीरस विषयावरही कवीनें आपली लेखणी चालविली आहे. त्यामुळें ' तानाजीचा संताप ', ' सुनीता ', ' दोन आळशी ', ' मी असाच ठीक ' यांचीं निपज झाली. प्रासांच्या गडबडींत व वृत्तांच्या अवडंबरांत पुष्कळशा कवितेंत ध्वनि, ओज व प्रसाद यांचीं विनाकारण हानी केली आहे. आणि यामुळेंच ' काहुर उठतो ', ' दिसूं लागला शिवार ', ' अर्धांगिणी ', ' मील मजूर ', ' कोरड धावली मुखास ' असे शब्दसमुच्चय सहज सुधारतां आले असतांही ते तसेच राहून गेले.

बहिरंगापेक्षां केव्हांही अंतरंग महत्त्वाचें असते. तथापि कवीनें बाह्यतेकडे अधिक लक्ष दिल्यानें अंतरंग त्या मानानें बरेच अस्पष्ट दिसतें. प्रासांच्या हव्यासामुळें कल्पनाही दुर्बोध झाल्या आहेत. अर्थात ग्रामीण जीवन व विनोद यावर आधारभूत झालेल्या कवितांत हा दोष अजिबात दिसत नाहीं. तेथें स्वाभाविक

रचना, सोपी भाषा आणि सूक्ष्म निरीक्षण दृष्टीस पडतें. ग्रामीण्य विषय, कल्पना व शब्द या त्रयींमुळें त्या वाचकांचे मनावर छाप पाडूं शकतात.

शृंगारात्मक कविता वाचतांना कविवर्य तांबे यांची आठवण होते. तथापि कल्पनांची गुंतागुंत करण्याच्या कवि सुरेश यांच्या पद्धतीमुळें तांब्यांच्या काव्यांतील प्रसाद उत्पन्न होऊं शकला नाहीं. मात्र—

‘ कीं हास्यातुनि प्रसवीते ती डाळिंबीच्या बिया ’...

‘ सुळकते कळस सुंदर
धरि हृदय मंदिरावर
जरि पर्टि चेपले शीग न त्यांची ढळो ’...

‘ फेसाळले पेय तुज बाटलीचे ’...

‘ कुवासनांची कुडींत कुंडी
तिथेंच आत्मा खाइ गचांडी ’...

अशा क्लिष्ट कल्पना अन् दुर्बोध ओळीमुळें काव्यसौंदर्य हिणकस ठरलें. पाश्चात्यांच्या कल्पनांचें अंधानुकरण केल्यानें

‘ शिशिर थिजवी जेधवा या जलातें ’

अशा अस्वाभाविक गोष्टीही ओढूनताणून आणल्या गेल्या.

तथापि कवि सुरेश हे उदयोन्मुख कवि आहेत. रे. टिळकांच्या ‘ सुशीले ’ प्रमाणें त्यांच्या कविता ‘ बाल्य आणि तारुण्य याजमध्यें ’ असल्याचा भास होतो. त्यामुळें त्यांचे दोषहि एक प्रकारें मनोरम वाटतात. कालांतरानें कवि सुरेश काव्यतंत्राच्या क्षेत्रांत सराईत होतील व रचनेच्या गुंतागुंतीपेक्षां सरळपणा, प्रसाद, ठाकठिकपणा व अर्थगांभीर्य त्यांच्या काव्यांत उत्तरोत्तर अधिकाधिक दिसूं लागेल अशी मला आशा वाटते.

पुणें
१८-२-४२

— वि. द. घाटे.

टरटरा निघाले कणिस पोगऱ्यांतुन
वर झुललं फुल्लर पिवळं हळदीहुन
जणुं किसुन फेकलं सोनं देवाजिनं ( —'सुगी')

... ... ...

हे यांत्रिक सांगाडेच मजशिं भासती ( —'विमानांतून')

... ... ...

पडदा सारुन हलुंच बाजूला कमळा काढी मान
निसर्गांतलं फूल कुंपणावरलं झुकलं छान ! ( —'प्रेमाची वाट')

... ... ...

याप्रमाणें अनेक उल्लेखनीय ओळी जातिवंत कवीस साजेशा झाल्या आहेत. अशा कल्पनामय अन् अर्थमय कवितांत 'ओला दुष्काळ', 'प्रेमाची वाट', 'राखरांगोळी', 'विमानांतून' व 'विरहि ओहोळ' या पांच कवितांचा प्रासुख्यानें अन्तर्भाव करावा लागेल. किंबहुना सर्व संग्रहांत पांच कविता सर्व दृष्टीनें सरस ठरतात. या वर उध्दृत केलेल्या पांच कवितामुळें कवि सुरेश प्रसिद्धीस येतील अशी आशा करावयास भरपूर जागा आहे.

अर्थात सर्वच गोष्टी सर्वगुणसंपन्न असूं शकत नाहींत या न्यायानें याही कवितासंग्रहांत अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, ज्यामुळें संग्रह डागळला आहे. विषयवैचित्र्याच्या फाजील भरीस पडल्याने कित्येक सामान्य व नीरस विषयावरही कवीनें आपली लेखणी चालविली आहे. त्यामुळें 'तानाजीचा संताप', 'सुनीता', 'दोन आळशी', 'मी असाच ठीक' यांचीं निपज झाली. प्रासांच्या गडबडींत व वृत्तांच्या अवडंबरांत पुष्कळशा कवितेंत ध्वनि, ओज व प्रसाद यांचीं विनाकारण हानी केली आहे. आणि यामुळेंच 'काहुर उठतो', 'दिसूं लागला शिवार', 'अर्धांगिणी', 'मील मजूर', 'कोरड धावली मुखास' असे शब्दसमुच्चय सहज सुधारतां आले असतांही ते तसेच राहून गेले.

बहिरंगापेक्षां केव्हांही अंतरंग महत्त्वाचे असते. तथापि कवीनें बाह्यतेकडे अधिक लक्ष दिल्यानें अंतरंग त्या मानानें बरेच अस्पष्ट दिसतें. प्रासांच्या हव्यासामुळें कल्पनाही दुर्बोध झाल्या आहेत. अर्थात ग्रामीण जीवन व विनोद यावर आधारभूत झालेल्या कवितांत हा दोष अजिबात दिसत नाहीं. तेथें स्वाभाविक

रचना, सोपी भाषा आणि सूक्ष्म निरीक्षण दृष्टीस पडतें. ग्रामीण्य विषय, कल्पना व शब्द या त्रयींमुळें त्या वाचकांचे मनावर छाप पाडूं शकतात.

शृंगारात्मक कविता वाचतांना कविवर्य तांबे यांची आठवण होते. तथापि कल्पनांची गुंतागुंत करण्याच्या कवि सुरेश यांच्या पद्धतीमुळें तांब्यांच्या काव्यांतील प्रसाद उत्पन्न होऊं शकला नाहीं. मात्र—

‘ कीं हास्यातुनि प्रसवीते ती डाळिंबीच्या बिया ’...

‘ सुळकते कळस सुंदर
धरि हृदय मंदिरावर
जरि पर्टि चेपले शीग न त्यांची ढळो ’...

‘ फेसाळले पेय तुज बाटलीचे ’...

‘ कुवासनांची कुडींत कुंडी
तिथेंच आत्मा खाइ गचांडी ’...

अशा क्लिष्ट कल्पना अन् दुर्बोध ओळीमुळें काव्यसौंदर्य हिणकस ठरलें. पाश्चात्यांच्या कल्पनांचें अंधानुकरण केल्यानें

‘ शिशिर थिजवी जेधवा या जलातें ’

अशा अस्वाभाविक गोष्टीही ओढूनताणून आणल्या गेल्या.

तथापि कवि सुरेश हे उदयोन्मुख कवि आहेत. रे. टिळकांच्या ‘ सुशीले ’ प्रमाणें त्यांच्या कविता ‘ बाल्य आणि तारुण्य याजमध्यें ’ असल्याचा भास होतो. त्यामुळें त्यांचे दोषहि एक प्रकारें मनोरम वाटतात. कालांतरानें कवि सुरेश काव्यतंत्राच्या क्षेत्रांत सराईत होतील व रचनेच्या गुंतागुंतीपेक्षां सरळपणा, प्रसाद, ठाकठिकपणा व अर्थगांभीर्य त्यांच्या काव्यांत उत्तरोत्तर अधिकाधिक दिसूं लागेल अशी मला आशा वाटते.

पुणें
१८-२-४२

— वि. द. घाटे.

# अभिप्राय

कवि सुरेश यांचा कवितासंग्रह मी वाचला. यांतील जानपद कविता खेड्यांतील जीवनाशीं तादात्म्य होऊन लिहिल्या असल्यामुळें, त्या जीवनाचे हुबेहुब चित्र त्यांत उतरलें आहे. आपल्या वस्तीचा मोठा भाग खेड्यांतच राहत असल्यामुळें वास्तविक पाहतां त्या जीवनाची हृदयंगम चित्रें रेखाटली जावींत. परंतु तितकी तीं जात नाहींत ही शोचनीय गोष्ट आहे. त्या दृष्टीनें पाहतां कवि सुरेश यांचा हा कविता-संग्रह फारच प्रसंशनीय आहे यांत शंका नाहीं.

सरळ व सोप्या भाषेंत वास्तवतेचें यथार्थ वर्णन इतक्या सुंदर रीतीनें केलेलें क्वचितच पाहण्यांत येतें. कवि सुरेश यांनीं आपला लेखन-व्यवसाय अव्याहत चालू ठेवल्यास ते प्रथित-यश कवि होतील अशी खात्री वाटते. हा अभिनव कवितासंग्रह लिहिल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

बडोदे,<br>
ता. १ जानेवारी १९४२

**रामचंद्र शामराव माने,**<br>
**पाटील.**

# गरीबाची श्रीमंती

(छंद देवद्वार)

तुजशीं प्रासाद-महाल विलासी,
मज ही वनाशीं पर्णकूटी
पलंगीं विलसे मऊ शय्या तुझी,
गवताची माझी माच्यावर
तुजशीं लोंबती सुबक झुंबर,
मजशीं मोहर आम्रवृक्षीं
विंझणा विजेचा तुज घाली वारा,
मज भरभरा तरू-शाखा
तुझे ते मनोरे उंच, देती हवा
तैसा हा माळवा मज वृक्षीं
फुलती वाटिका तुझी परसांत,
मजशीं रानांत पिकें तैशीं
भृत्य-भार तूझा घाले तिज पाणी,
माझा एक रानीं मेघराणा
गायकांचे ताफे तुज रंजविती,
मज पक्षी गाती रानांतून
कलावंतिणींचें नृत्य तुज मोहे,
मज मयुर हे नाचतात
फेसाळलें पेय तुज बाटलीचे,
मज निर्झरीचें गोड पाणी
शितलता वारी तुझी शालजोडी,
माझी ही घोंगडी खांद्यावर
षड्रस पक्कान्नें तुज भोजनास,
मज मिळे खास वनमेवा

१९५२८

कुंदकळ्या

# कां हताश होशी नरा !

( जाति—भरतखंड पादाकुलक )

जर हरा शांतिचा झरा
कां हताश होशी नरा ! ॥ ध्रृ० ॥

जरि सरिताजल सोशि उन्हाळा
सुकतो डोहहि अथांग काळा
जगती जलचर प्राशुनि गाळा
—बरसात आणि तिज पुरा
गळतां तरुचीं पिकलीं पानें
गमते सुकला हा तापानें
हताश होउनि जाति उडुगणें
—ये वसंतांत फुलवरा
दोन दलांची पिकें कोंवळी
बाळें धरणीचींच सोनुलीं !
ऊन लागतां होति किलकिली
—परि मेघ शिंपी जलसरा
मेघजलाविण चकोर कष्टी
चिंती 'होइल कधिं तरि वृष्टी !'
चोंच वासुनी करि वर दृष्टी
—परि तोही प्राशी निरा
कभिन्न काळा दूर कोळसा
मजूर खपुनी करिती उपसा
काळोखाला दीपच जैसा
—कधिं त्यांजहि गवसे हिरा

सारवान लंघवां सहारा
संपुनि जळसंचय तो प्यारा
जीव लागतां प्राशूं वारा
—तों दिसे खजूरी-झरा

कधीं तुफ़ानीं गवसे तारू
बहु चिंतातुर होति उतारूं
जरी न शके त्या कुणिही तारूं
—परि तेहि गांठतें तिरा

जन मधुसंचय लुटुनी नेती
मधमाशा नच मानिती खंती
हृदयाची ही बघ श्रीमंती
—जमविती पुन्हां त्या गरां

निसर्ग दावी कधिं निर्दयता
पिकें वाहवी हां हां म्हणतां
श्रव कृषिकांचे वच, हें बवतां
—'कसुं पुन्हां गळ्या कंबरा !'

# आत्मविकास

(जाति—पादाकुलक)

जो विषयाचा जहरी पेला—
सगळा प्याला, तो नर मेला!
निलाजरी ही स्वैर वासना
मरत मढ्याही आणि चेतना
कणखर असला देहकुंजर
करुनी टाकी अस्तिपंजर,
जागृत डोळे मिटले दिसती
पतंग दिपकीं कित्येक फसती,
श्वान गवसल्या अस्तिम फोडी
स्वदंत-रक्तीं मानी गोडी;
कुवासनांची कुडींत कुंडी
तिथेंत आत्मा खाइ गचांडी,
गटंगळ्यांनीं क्षिणला आत्मा
होइल केवीं तो परमात्मा !
काळाची वरि पडतां छाया
बघतो जाया त्यजुनी काया,
जीवनिं त्याच्या जीव न कांहीं
धान्याची फुटल्यावर लाही—
रुजेल का ती जल भरतांही ?
तशीच झाली गत याचीही
इह जगताच्या मुकला विजया
हुकला डावहि जन्माच्या या
सडक्या देहीं पडकें देऊळ
आत्मा होई तेथे व्याकुळ !

*　　*

अजुनि करा तरि जीर्णोद्धारा
सारुनि सारा दूर पसारा
दुर्व्यसनांची रचुनी रास-
लावुनि टाका सरबत्तीस,
साधा मंगलमय आचार
बाधेचे नच जेथें चार
बांधा देहाचें दृढ मंदिर
जेथें आत्मा राहिल स्थीर,
सुव्यसनांचीं सुमनें वचा
आत्म्याची ही पूजा-अर्चा
उपाधि आत्म्यावरची कांत
झडुनी जातां निर्मलतेंत
प्रसन्न होईल आत्मा साचा
मुळीं न राहिल लेचापेचा,
पर आत्म्यांच्या विद्युत तारा-
मिळतां निज आत्म्याच्या द्वारा
कळेल सारें एकच स्थानीं
आत्म्याचे वच आत्मा जाणी
विविध आशयीं एकच पाणी
सागरांतुनी वा कोठोनी
फिरतें गगनीं, येतें सदनीं
उमगा आध्यात्मिक ही वाणी !
कळतिल वार्ता मग बिनतारी
गूढ उकलतिल साक्षात्कारीं
लव न राहतिल भाव परापर
एकच आत्म्यांचा रत्नाकर !
भेदच उरला मग तो कोठें
ब्रम्हस्वरूपीं जातां नेटें !

# अद्‌भूत तपस्वी

( वृत्त—देवराज )

कोण हा मुनी तपास बैसला असा इथें
घोरता वनीं न यास भीति काय दाविते ?
वांकले कराल, उंच डोंगरीकडे किती !
देति ना रवीकरांस पाहूं तेथली क्षिती
किर्र दाटली दिसे सभोंवतीं वनस्पती
यामिनी तिथें दडून दाखवी भयाकृती
पुष्पवेलि वेष्टिती तरूसमूह सारखे
मन्द वायु डोलवी लताध्वजांस हालकें
क्रूर व्याघ्र फोडिती डकार उग्र खालती
ऐकतां मृगार्भकें भयाण धूम धांवती
निर्झरी निनाद काढिते अखंड कोंदुन
प्यावया जलास येति या स्थलीं पशूगण
शेषनाग, वाघ, सिंह, लांडगे, ससे, रिसे
बैसती मुनीसमीप वैर सोडुनी कसें !
शांत मूर्ति आसनीं, सदैव ध्यान लोचनीं
जिंकिले दशेंद्रियां गढून योग साधनीं
वाढलीं नखें प्रदीर्घ, झाडिते धरा जटा
श्मश्रुभार, वक्षलोम स्थापिती समीपता
आत्मतेज फांकले दिसून ये मुखावरी
नेत्र खोलतां जरा, पळे भिवूनि शर्वरी
लोटलीं युगें जरी, ढळेच ना यदासन
जाणती कुणी न यास-येइ केविं कोठून ?
एकतानता तपस्वि सोडिनाच थोर हा
जंगली जिवांस कोण ओढ लाविली महा !

# सुनीता

( जाति—लीलारति )

१

ही कोण सुंदरा रोज जाय मंदिरा
ओंजळी भरोनी सुमनें वाही हरा
अन् घालुं लागते फिऱ्या देवळाप्रतीं
करि नमस्कार दर फेरीं द्वारांत ती
मनिं आशा कसली हिच्या असावीं बरें ?
हिज शिशू माहिजे वागडतें गोजिरें !

२

तो– " अजुनही न का सैंपाक जाहला मुळीं ?
मज वेळ न आतां जातों खानावळीं "
ती– " होईल पांच मिनिटें तरि थांबणें ? "
तो– " करशील काय मग प्रिये, ताट वाढणें ?
ती– " बदलून जरा हें कमरेचें तांतडें
येतेना मीही तुमच्यासंगे गडे "

३

" हा गुलाब इकडें फुललाना प्रियकरा,
घुमसला बघा तो तिकडे बटमोररा
हीं कमळें आतां बघा लागली फुलूं
ती चाफेकलिका अनिलें करिते डुलूं "
" हें दृश्य दाविशी कशास मज उपवनीं
जें भरलें सखये, तुझिया चन्द्राननीं "

४

घेतली शिरावर बाले, तूं घागर
करलता चढविल्या अन् दोन्ही तिजवर
झरझरा चालली टाकित, तूं पाउलें

जळ डुमुक डुमुक वाजतें घागरींतलें
या नादावर धरितात ताल ते परी
लावण्यकळस जे हृदयमंदिरावरी !

५

बाजेवर करूनी शेज सुंदरा बसे
करि दार बंद मधिं लावुनिया आडुसें
जीव तगमग तगमग होई खालींवर
घरधनी येइना कसा म्हणुनि लौकर ?
तों खिट्ट वाजतां, आले तिज वाटलें
करि दार खुलें तों कुतरें भिन्नाटलें

६

" दे भरुनी पेला " म्हणुनी वदलों तिला
परि निजली होती शांत शयनिं प्रेमला
तिजला कशास द्यावी तसदी आतां तरी
घेतला घटांतुन पेला भरुनीं करीं
ती वदली उंचावुनि मानेचा कडा
" मज द्याना सखया हातांतिल तेवढा ? "

७

गजबजला होता वर्ग आज त्यामुळें
बैसले मुलींच्या बांकावरती मुलें
शिरतांच सुधा तिज खपलें ना हें जरा
फणक्यांत निघे सांगाया प्रोफेसरा
दोघांचें घडतां दारिंच आलिंगन
तिज मिळे प्रसिद्धी बहु कॉलेजांतून

# बालिश शंका

( जाति—दिंडी )

सान धवलांगी चपळ मासळ्या या
जळीं खेळत शोधिती कांहिं खाया
अंग यांचें चमकतें जेविं पातें
नयन दिसती जणुं कोंदणी मणी ते !
सिञ्चतां जळिं चुरमुरे एक मूठ
जमति सारे क्षणिं करायास लूट
सान उदरांस्तव कोण ही लढाई
समरिं सैनिक कीं करिति हातघाई !
सकल सरले कण बघुनि नील तोयीं,
भेद भुलुनी या फिरति ठायिंठायीं
किरण कोमल जळिं लाभतात यांस
लव्हाळें, मृदु शेवाळ लपायास
सौम्य शीतल या रम्य शान्त वेळीं
मजा वाटावी योग्य यांस खेळीं
परी शंका मज असे एक खास
सानुलींनो, द्या तुम्हिच उत्तरास
' शिशिर थिजवी जेधवा या जलातें
काय करितां तेधवा कथा मातें ? "

# गोफणवाला

( जाति–केशवकरणी )

भल्या माणसा, गोफण माझी वाटे तुज का उणी !
जिवाची माझी ही स्वामिनी !
शेत मळीचें सुंदर साचें, त्याच्या मध्यन्तरीं-
वडाचें झाड माळ्वा वरीं
पेरली बाजरी, ज्वारी आणिक तुरी
करकरीत भरल्या दाण्यांनीं या सरी
मन जातें निवुनी पाहुन फुल्लर तुरीं
सकाळ संध्याकाळ दिनभरीं राहुन शेतान्तरीं
वाळितों पक्षी मी किति तरी
भूक लागतां, कांदा कैरी अन् चटणी भाकरी
बैसतों खातच माळावरी
नजर परी मम दूर अन्तरीं, येतां कुणि अवसरीं
सांगतों तया, 'करा न्याहरी'
उरलेलि ठेवितों वृक्षाच्या खांदरीं
जल गार पिवूनी देतों ढेंकर वरीं
परि वावरतें मम चित्त सदा वावरीं
चाहुल येतां मनीं काहुर ऽ उठतो जों झडकरी
सोडितों गोफण ही भिरभिरी
कधीं कधीं मी डुलतों, पाहुनि डुलतीं कणसें वरी
चकमकती दाणे मोत्यांपरी
कधीं कधीं चहुबांध फिरोनी गातों गुणगुण हरी
पुरा मम सुभाव देवावरीं

कधिं उभा राहतों बांधवारुळावरीं
कधिं खात बैसतों हुरडा शेतान्तरीं
कधिं होय मनीषा माझी उमऱ्यावरीं
कधीं तुरीच्या वा चवळीच्या शेंगा नेतों घरीं
जयांची धनीण भाजी करी
संध्याकाळीं वाट पाहते कारभारिणऽ घरीं
तिच्याशी गोड शद्ब मी करी
कुऱ्हाड खादीं, कमरीं गोफण, भाकर घेउन शिरीं
येतसे तसाच माळावरीं
भर झोंप शिवारीं एकच माझी खरी
मग उठुनीं चिलमीमधें तमाखू भरीं
खांकरुनी सुरका एकच ओढी जरी
हुरुप अन्तरीं, एक असाटी भरतों वऱ्यावरीं
दचक तो माझा सर्वां परीं
पहाट होतां, शीतळ वारा सुटते मग सुरसुरी
वाकळी घेतों आंगावरी
जाळ करोनी आंग शेकतां येते मज तरतरी
बैसतों गातच कांहीं तरी
ती शुक्रतारका येई क्षितिजावरी
तो रामपहारा, रामनाम श्रीहरी–
जपतांच जळावीं पापें जीं अन्तरीं
या दिनमणिचें लाल तांबडे फुटतें जें कंदरीं
तयाला नमस्कार मी करी

# सतीचें भ्रमण

( छन्द—परिलीना )

[ चाल—एकत्र गुंफोनी जीवित धागे ]

वणवण तुज धुंडीतें राया,
बैसलास कोठें धरोनी छाया !
    प्रीति-बोल काहे कानीं
    ऐकतें तव मी रानीं ?
जाई-शेवंतीच्या वेलींनो, सांगा
जातां पाहिला का गे जिवलगा ?
वंचितां खां मज चिंतोनी वैर ?
अन्तरतारू हें भडकें स्वैर
    सुटे हातचा सुकाणू
    स्थिरता कैची मी आणूं ?
'मंजुळे' मंजुळ हांक ही आली
बाहेर दारांत स्वारी का ठेली ?
नोहे हांक जीव भ्रमीत होई
राईंत कोकिळ करितो कुई
    वाजे वारूचा धुंगूर
    अंतरे परी मी दूर
घुंगूराच्या रोखें गांठीन स्वार
लागेल पायीं न जाऊं देणार
नोहें घुंगूर, रात किरकीरे
कोण दावेदार भ्रमवी बरें ?
    जिवाच्या चंद्रा तूं वर
    भ्रमतें मी धरेवर

तुझी माझी नेत्रबाहुली एक
झाली कैशी राया, ही चुकामूक !
पदर धरोनी रोधी हे कोण
दुष्ट आडविते कां नागफण ?
  बंधनीं न मी राहीन
  धुंडोनी राया काढीन
सोडोनी ते गेले ज्या दिनीं पाही
त्याच दिनीं दिशा भंगल्या दाही
वितळून होय हृदय पाणी
राया, राणी तुझी फिरे ही रानीं
  भ्रम मस्तकीं हा खास
  स्वारी गेली मुलुखास
आली चाहूल ती प्रतिमा पाही
थांब राया, तुज आरती वाही
दीप आरतीचा फुंकीते कोण
फासे कुंकूभाळीं काजळी कोण ?
  अंधारीं भास हा होई
  कुंकुमतेज तें पाही-
धडधडे चिता ती गंगेतिरीं
धगधगा जाळ झंकारे वरी
स्वारी आंत दिसे भोंवतीं आग
वक्त झाला म्हणोनी का हा राग ?
  कटीं खोवोनी पदर,
  मनीं व्हावे न अधीर
धीर धरा येते धांवत तीर
राहूं लाल रंगीं घरांत चिर !

# राखरांगोळी

( वृत्त—वसन्त गज्जल )

कशाला पंजरामाजीं मला तूं राखिशी सांग ?
निनावी सौख्य देवोनी पहाशी फेडण्या पांग
भराऱ्या घेत हिंडावे अशा त्या माझिया बीद्रा-
वियोगी होय मी आतां, मनीं ही जांचते बाधा
महा बागांमधूनी मी फळें खाई किती सांगू !
तयांतें पारखें केलें, तुला हें होय ना लागूं ?
पिकावा पाड जो वृक्षीं तया मी चंचुनें फोडी
भिजावी चंचु ही माझी रसानें, चाखितां गोडी
जिवाच्या कोंदणामाजीं जिला मी ठेविलें खोल
अशी मत्प्रेमला मैना वदावी कोणते बोल ?
जगाचा गोल हिंडोनी मला ती धुंडिले काय,
निराशा होउनी अन्तीं असावी बोलली ' हाय ! '
कशाचीं त्यांजला आतां मिळायाचीं फळें ताजीं !
अजूनी नेत्रही त्यांचे खुले जों जाहले नाहीं
विपत्ती ही अशी यावी नशीबा, हाय रे पाही !
नको ती यादही याया जिवाची होतसे लाही
स्वतःची हौस पूर्वाया असें त्वां लोटिलें खाई
बळें तूं लाविशी मातें वदाया ही तुझी बोली
खऱ्या मन्मायभाषेची कराया राखरांगोळी !

# विमानांतून –

( जाति–स्नेहसागर )

हिंदभूमिचा प्रदेश आतां गड्या, लागला दिसूं
गाळिती बहुजन जेथें असूं ॥ धृ० ॥
हें विमान अपुलें भरवेगें चाललें
भलभले शैलही दिसती जणुं वारूळें
हें शहर भासते अंथरले शिंपले !
बघुनि येथली दशा, लागतिल हृदयीं जळवा डसूं
गाळिती बहुजन जेथें असूं
नजर लावुनी दुर्बिनींत, हें शहर जरा न्याहळूं
थानंही वळयें घेते हळूं
कामास चालले मीलमजुर हे किती !
पोटाची खळगी ठेवुनि अर्धी रिती
हे यांत्रिक सांगाडेच मजशीं भासती !
कष्ट करूनि सारखे, तयांचें कंबर बघतें बसूं
गाळिती बहुजन जेथें असूं
तिरकमठ्यासम तनु पातळशी, चष्मा नेत्रांवरी
चालता दुबळा कुणि हा तरी
कांखेंत मारिलें कसलें पुडगें पहा !
कुणि साहित्यिक हा खास असावा महा
डोळ्यांत घालुनी तेल, लिही लेख हा
जरि पाजळली ज्योत जिवाची चीज तियचें नसूं
गाळिती बहुजन जेथें असूं

# राखरांगोळी

( वृत्त—वसन्त गज्जल )

कशाला पंजरामाजीं मला तूं राखिशी सांग ?
निनावी सौख्य देवोनी पहाशी फेडण्या पांग
भराऱ्या घेत हिंडावे अशा त्या माझिया बीद्रा—
वियोगी होय मी आतां, मनीं ही जांचते बाधा
महा बागांमधूनी मी फळें खाई किती सांगू !
तयांतें पारखें केलें, तुला हें होय ना लागूं ?
पिकाया पाड जो वृक्षीं तया मी चंचुनें फोडी
भिजावी चंचु ही माझी रसानें, चाखितां गोडी
जिवाच्या कोंदणामाजीं जिला मी ठेविलें खोल
अशी मत्प्रेमला मैना वदावी कोणते बोल ?
जगाचा गोल हिंडोनी मला ती धुंडिले काय,
निराशा होउनी अन्तीं असावी बोलली ' हाय ! '
कशाचीं त्यांजला आतां मिळायाचीं फळें ताजीं !
अजूनी नेत्रही त्यांचे खुले जों जाहले नाहीं
विपत्ती ही अशी यावी नशीबा, हाय रे पाही !
नको ती यादही याया जिवाची होतसे लाही
स्वतःची हौस पूर्वाया असें त्वां लोटिलें खाईं
बळें तूं लाविशी मातें वदाया ही तुझी बोली
खऱ्या मन्मायभाषेची कराया राखरांगोळी !

# विमानांतून –

( जाति–स्नेहसागर )

हिंदभूमिचा प्रदेश आतां गड्या, लागला दिसूं
गाळिती बहुजन जेथें असूं ॥ धृ० ॥
हें विमान अपुलें भरवेगें चाललें
भलभले शैलही दिसती जणुं वारूळें
हें शहर भासते अंथरले शिंपले !
बघुनि येथली दशा, लागतिल हृदयीं जळवा डसूं
गाळिती बहुजन जेथें असूं
नजर लावुनी दुर्बिनींत, हें शहर जरा न्याहळूं
यानहीं वलयें घेते हळूं
कामास चालले मीलमजुर हे किती !
पोटाची खळगी ठेवुनि अर्धी रिती
हे यांत्रिक सांगाडेच मजशिं भासती !
कष्ट करूनि सारखे, तयांचें कंबर बघतें बसूं
गाळिती बहुजन जेथें असूं
तिरकमठ्यासम तनु पातळशी, चष्मा नेत्रांवरी
चालता दुबळा कुणि हा तरी
कांखेंत मारिलें कसलें पुडगें पहा !
कुणि साहित्यिक हा खास असावा महा
डोळ्यांत घालुनी तेल, लिही लेख हा
जरि पाजळली ज्योत जिवाची चीज तियचें नसूं
गाळिती बहुजन जेथें असूं

जी संपादुन पोटाचा नच सवाल सुटतों मुळीं
हवी ती कशास विद्या खुळी ?
वर बघूं लागले श्रवुनी ही घरघर
कुणि सुशिक्षीत बेकार फिरति हे तर !
जीवनीं निराशा, असेल मनिं काहुर
शास्त्र्यांच्या फुलबागा फुलती, नच जागा यां तसूं
गाळिती बहुजन जेथें असूं
शहर लंघुनी दिसूं लागला शिवार काळा अतां
पहा हा शेतकरी राबतां
छायेंत टांगले कुडतें फांदीवर
भर ऊन साहुनी दांकितसे नांगर
हा घाम शिंपुनी ओलावी वावर
श्रमास अन्तीं मीठभाकरी पुरी काय त्या नसूं ?
गाळिती बहुजन जेथें असूं
बघ आतां हा दिसे आपल्या गांवाचा डोंगर
श्वेत वर स्वामीचें मंदिर
वाढली घराची उत्कण्ठा बहु मनीं
जन सारे अपुले भेटतील येउनी
असतील उभ्याही आतुर अर्धांगिणी
परत न आलों लवकर म्हणुनी लागतील त्या रुसूं
गाळिती बहुजन जेथें असूं

# विरही ओहळ

(छन्द–देवीवर)

[ चाल–आकाशच्या अन्तराळीं ]

अन्तरलों पाय तुझे
आतां कैची होणें भेट,
जन्माची ही ताटातूट !

बहुरुनी सुमवेलीं
विहरल्या आसपास,
स्मरें त्यांच्या सहवास

संचरतां स्वैर वायु,
सुमनांची पखरण
करी सुगंधी जीवन

मासळींची सळसळ,
जळीं चाले रात्रंदिन
झुरे तिज आठवून

तहानल्या मेंढरांची
येतां धांव ऊन्हांतून,
करी शांत ती पाजून

गुराखींचा मित्रमेळा
तिरीं करीत न्याहरी,
दिसायाचा कोठें तरी ?

घुमे तरूराजींतुनी
पांखरांची किलबिल
कैची श्रवाया लाभेल !

उडत्या धेत स्वैरतेच्या
प्रेमभरें चुंबीयेली,
टेकडीची गालखळी
सरितेच्या संगतीनें
स्वत्व गमाविलें पार
आतां पस्तावा ये फार !
मावळलें सौख्य सारें,
झालों सागरीं सन्यासी
नच मज कोणी पूसी
खाई लाटा सागराच्या,
फोल सुटायची आस
चिरन्तन बन्दीवास !

# जग हें असेंच

( जाति—मुद्रिका )

जव आई मेली दु:ख बहुत लोटलें
येउनी वृद्ध बायांनीं ढळढळा अश्रु ढाळले

म्हातारी वदली कुणी एक ती अशी—
' मज समज बालका, तुझी कीं प्रेमळ आई जशी '

गुदरला बाप, आधार-स्तंभ मोडला
' मज समज बालका, तुझा कीं बाप प्रीतिचा जसा

प्रिय भगिनी माझी, अहा सुगुण सुंदरी !
इह लोक सोडुनी जातां हळहळलो बहु अंतरीं

कुणि वदली युवती एक येउनी अशी—
' मज समज बालका, तुझी भगिनीच पाठची जशी '

मग मेली कांता जखम ही न थोडकी
परि वदलें कोणी नाहीं ' मज म्हणा प्रिया लाडकी !'

# चिमण्या कावळे

( जाति–दिंडी )

रम्य कॉलेजांतील एक स्थान
नंदनाचा कीं फुले बाग छान !
जिथें चिमण्याकावळे जमति रोज
दोन घटकांची करावयास मौज
झाडपानांचीं पातळें सुरंगीं
तशीं पुष्पांचीं पोलकींहि अंगी–
लेवुनी त्या चालती उड्या घेत
जशा सजल्या नायिका थेटरांत !
कुणी जाडीनें मुद्गलासमान
( तिजाशि द्यावा कीं म्हशीचाच मान ! )
कुणी चवळीची शेंग पीत रंगी
दिसे हरिणीची चपळ चाल अंगीं
कुणी शरिरानें दिसे फार स्थूल
जणूं खासा सडकेस लोह-रूळ !
कुणी शोभे लावण्य-काय-मूस
करी यौवन अंगांत मूसमूस
कुणी दिसते तारुण्यरहित रोड
जणूं संत्राची निपळलीच फोड !
लांब देठी लेवुनी कुणी डुल
चालतांना जे चाटतात गाल
कुणी मुरडे मानेस चालतांना
जशी बदकी बदकास भेटतांना !

कुणी चाले जणुं सागरांत नाव
हंसिणी कीं हळुं पोहते तळाव !
अशा चिमण्यांचा पाहुनि जमाव
कावळेही करितात कांव कांव
कावळ्यांच्याही बहुत जातिभाती
चालतांना कुणि काढितात छाती
कुणी तगडा शोभतो चिरेबंद
करी सगळा चालतां मार्ग बंद
कुणी शोभे कागदी पहिलवान
भीति वाऱ्याची जायचा उडून
कुणी बाजारी दोडक्यासमान
कुणा शेजारीं एडकीच मान
कुणी तेजस्वी जणूं सिंहछावा !
रक्त ताजें उसळून घेत धांवा
कुणा शोभे तनु पीळदार गीट
हरिकळपांतिल जणूं काळवीट !
तोंच घंटानादास ते श्रवून
जाति चिमण्याकावळे भुर उडून

१०५२८

# खेड्यांतली हिरकणी

( जाति—मनी )

घेउनि कळशी कटीं,
निघाली पाण्याला एकटी ॥ धृ० ॥
प्रथम मुळाची नवीन नवरी,
बघत भूषणां पदर सांवरी
जणुं पडद्यांतुनि ये बाहेरीं—
नाट्यगृहांतिल नटी
खुले मुखावर छटा हांसरी
मुरडत मानाहि घोळ आंवरी
ठुमकत, ठुमकत ये गंगेतिरीं
खोउनि वरती वटी
पाणथळ्याशीं येउनि पाहे
जल गंगेचें गढूळ वाहे
' मना तिकडच्या रुचेल कां हें ! '
उभीं संशयें तटीं
दिसतां वाळू उघडी पडली
तींत झरा ती करिती झाली
शुद्ध जलातें शोधी खालीं
पुन्हां पुन्हां थापटी
नितळ जलाचे फुटुनी पाझरा
भरूं लागतां झरा झरझर
कलती कळशी धरली त्यावर
भरायास शेवटीं
नव्हतें माहित उगमावरतीं
झाली त्या दिनिं बहु जलवृष्टी
महा पुराची जीभ उसळती—
येउनि, तिज घे पटीं

# विरहमाधुरी

(छन्द—देवद्वार)

हर्षते पाहुनी इन्दु कुमुदिनी
मम आगमनीं तूंही तैशीं
वृक्षावरीं वेल वेंघते ती जेवीं
आलिंगन तेवीं तव असे
पद्मावरीं रेले हंसिणी ती जेवीं
भिडशी तूं तेवीं हृदयास
कोंवळी लव्हाळी सळसळे जळीं
तवीं तूं वेल्हाळी लडिवाळ
लव वीज लव नील मेघान्तरीं
तेवींच अधरीं स्मित तुझें
चन्द्रिका पांघरी नभीं मेघशाल्ं
युवती लाजाळूं दिसे जणूं !
पाही लपवूं ती गौर तनु छान,
लावण्य लपेन परी मुळीं !
तेवींच तूं राग पांघरूं पहाशी
परिउले खाशी गालखळी
रवि उषा रंगी राहुनी पाठीस
तव जीवनास तेवीं मीही
भ्रमें मही प्रेमें भानुस भंवती
उचलली रीति ती तूं काय ?
वावडी अंबरी खेळे तन्तुवरीं
पाळिसी वैखरी तूंही माझी
तव मूर्ति माझ्या हृदयमंदिरीं
मन हा पुजारी पूजा करी
स्मरी गतसुखा राहुनिया दुरीं
विरहमाधुरी अनुभवी !

# ओला दुष्काळ

( जाति–केशवकरणी )

झडी लागली, देव कोपला काय गणू पाटिल
कसं हें साल असं गुदरलं !
देवदयेनं पीक चांगलं व्हतं बरं लाभलं
कसं पन सपनागत जाहलं !
या पावसानं लइ जीव कंटाळला
वाढलं ताट अन् घांस मुखाशीं दिला
तो तसाच खालीं हुनुनशान पाडला
पाहुनशानी काळिज जळतं लागल कोण्या थडी
नाव ही नशिबाची बापडी
बरी आग ती, ओलि आग ही देव पाखडी कसा
जाहला जीव जणू हा पिसा !
गुरं बांधली चार दिसापुन मुठभर चारा नसे
तयांना गवत आणावं कसें !
चालते जिवाची रात्रंदिन तळमळ
नव्हं कुठं कोरडं गुरं चाराया स्थळ
वाह ऽ तं पाणी रानांतुन झुळझुळ
पांधीधरुनी चिखल जाहला न ये चालतां धड
नको ही अशि ओली खरपड
वारापाणी करि धुळधाणी, पीक घेत लोळणी
कशाची आली मंग कापणी !
धोपापरि जोंधळा, बाजरीकणसं मातीमधीं
लागली तिथंच त्यांला उधी

तीं अरधींनिरधीं रुतलीं चिखलंतुनं
त्यां कोंब फुटोनी गेलीं तोंडांतुन
तें गेलं वाया धान्य वाफ लागुन
बारा महिने राब राबुनी देवा गत कां अशी ?
पदरीं हेंच काय टाकशी !
पळकांठीचं बोंड गळालं, नव्हं पगा राहिलं-
भराया शेताची तहशिल
मुइमुग गेला कोंब निघोनी, उपट तयाची कशी-
करावी, ओल जशीच्या तशी !
तो सुकला चारा गेला हुंडावुन
तीं पिवळीं पानं गेलिं काळवंडुन
त्यां गुरंवासरं लावीती तोंड न
चाऱ्यावांचुन शेतकऱ्याला व्हईल कधीं का बरं
मला हो, सांगा कीं खरखरं ?
गोरगरीबां काम न उरलं, झाले येडेपिसे
म्हणती व्हईल देवा, कसें !
पोटापायीं दिनभर खपती चार पैक त्यांजन
जेवणं अबरूचं कोठुन !
वैतागुन गेला मजूर देशोधडी
धड नव्हं त्यासनी आंथरण्या गोधडी
ऱ्हावहास नाहीं साधिसुधी झोंपडी
मोठं मोठं धनिसावकारऽ राहती शहरांतुन
आमची जाणिव त्यां कोठुन !
सकत् नव्हं राहिली साजरा करण्या दसरा–सण
दिवाळी आली मग् कोठुन !

हलकं पन पातळऽआणनं हवं तिच्यालागुनं
कुडतं मंग् माझं पाहिन
अन्नुदार माणसं आपन शेतऽकरी
दिन काढूं खावुन मीठभाकरी घरीं
पन उभं राहणं नक्को कुण्या ओसरीं
देवाजीच्या किरपेनं जरि दोन माप लाभतं
सहजच एक साल लोटतं
धनजि शेटचा हप्ता थकला, येइल जप्ति घेउन
पैका देवुं त्याज कोठुन !
संसारीं समदी अटाआट जाहली
गरिबाची ओळख श्रीमंता कोठली !
दाईल कोण हो, आशेची सांवली
कमनशिबीचा गुलामकीचा काळ कधीं हाटिल
मला हो; सांगा गणु पाटिल ?

# लाडकी ललना

( जाति—दिंडी )

“ पडे बारावर गडे, एक टोला
अजूनि डोळ्याला लाविशी न डोळा !
आज जीवा तव नसे काय गोड ?
म्हणुनि झाली ही अशी झोपमोड !

बहुत तलखी भासते आज काय ?
म्हणुनि तळमळ ही अशी फार होय
जवळ आणूं का विंझणा विजेचा ?
थांब पुसुं दे तव घाम कपाळाचा

जरा चोळूं का बाम हा कपाळीं ?
लेमनाची धर मुखीं एक गोळी
तुझ्या भाला बांधुनी हा रुमाल-
अंग शेकाया करूं काय जाळ ?

अहऽ धरणींला नको पाय टेकूं
थंड पडले हे जरा काय शेकूं ?
काय कोरड धांवली तव मुखास ?
देऊं प्याया का डांबल्या जलास ?

नको ते, घे हे भाजले मनूखे
बैस देतों तुज बंगलींत झोके
नको कंबर लचकेल अशी वाकूं
हवा भारी ही शाल काय टाकूं !

कळे मज ना कां कळा काढितेस ?
देऊं द्राक्षासव काय प्यावयास ?
हवे तुजशीं आणखी काय सांग ?
गरम पाण्याची करूं काय बॅग ?

जीवही का लागला मळमळाया ?
सूंटमध घे आणिले चाटवाया "
"सरा बाजूला त्वरें," गर्जली ती
"नका दाऊं मज कोरडीच प्रीति

कदर नाहीं मम जिवाची कुणास
धरी संसारीं फुका मी हव्यास !
दिसे शेजारिण दागिन्यांत नामी
असे लंकेची काय पार्वती मी ?"

# गुलाब-गेंद

(जाति-कुसुमबाण)

" हलविले गुलाब-गेंद इथुनि कुणि गडे ?
जायचे सभेस आज मजशिं तांतडें ॥ धृ० ॥
वेणिफणी आटपिली
टिकलीही टिपकविली
बदललीहि अंगांतलि
शालुं नेसुनी उभीच, काय हें घडे !
' स्नो ' तर हा मेजावर
पडलेली पावडर
कुणि न लाविला यां कइ
नेले मग तेच कुणी ? राग मज चढे
माहित का हें तिकडे ?
कळुं द्याना काय गडे,
मन माझें बहुत चिडे
बघत वाट सडकेवर तांगडें खडे. "
" शोधुनि का देऊं तुज ?
देशिलना खचित मज
तयांचे पराग रज—
सेवाया क्षणभर मम नासिकेपुढें ?
तर मग तूं ये ग अशी
धर समोर भिङ्ग कशी
लपवूं कां ते बघशी ?
नाचतात बघ गालीं गेंद त्याकडे ! "

प्रजाजनांना सुखी पाहुनी, होय स्वयेंही सुखी
करी नृप राज्योन्नति सारखी
भिन्न, भिन्न जातीय प्रजा नृप समतेनें वागवी
जनती ममता जणुं दाखवी !
' सत्यधर्म ' जगिं एक असावा ' चक्रवर्ति भूपती '
सुबोधी विश्वधर्मपरिषदीं
नृप ' कर्मवीर ' अन् ' धर्मवीर ' हा भला
अति अन्ध रूढिची तोडी हा शृंखला
जगिं ' राजयोगी ' या थोर पदा लाभला
हे जगदीशा, तव पदकमलीं लीन होउनी कवी
' चिरायू हो नृपराज़ी ', स्तवी

# नृप—प्रशस्ति

( जाति—केशवकरणी )

धन्य ! धन्य ! भूपाल सयाजी सदय पतितपावना !
प्रीतिनें करिशी प्रजापालना
दिगन्तरीं सत्कीर्तिगन्ध तव पसरे मधुमंगळ
वैभवें करिशि राज्य उज्ज्वल
विरळ, विरळ जीर सरस्वती–श्री–संगम, हृदयंगम
जाहला दिसे इथें उत्तम
मज गमे धर्म हा न्यायी नृप अवतरे
कीं उदार भूपति कर्ण वदावा बरें !
कीं राजकारणी अशोक नृप संचरें
विराजतो नृप मुकुटमणी जगिं विद्वज्जनसंगमीं
गमे हरिचंदन वृक्षद्रुमीं !
सुंदर, सुंदर, प्रजेस चढवी विद्येची भूषणें
भूपती विरळ असा लाभणें
विविध कलांचा विकास जेथें, वाङ्मय साहित्यही
असे जनसेवेला नित्यही
कामधेनुस राज्यांतुनि बहु फिरती ग्रंथालयें
पाजिती ज्ञानपया कीं स्वयें !
आदर्श राज्य हें करित जगीं भूपती
करि विदेशगमना निरखी भिन्न स्थिती
घेउनी सुतत्त्वें योजि स्वदेशाप्रतीं
भारतीय गत–वैभव येई येथें मज वाटते
खचित सद्भाग्य प्रभा फांकते !

प्रजाजनांना सुखी पाहुनी, होय स्वयेंही सुखी
करी नृप राज्योन्नति सारखी
भिन्न, भिन्न जातीय प्रजा नृप समतेनें वागवी
जनती ममता जणुं दाखवी !
' सत्यधर्म ' जगिं एक असावा ' चक्रवर्ति भूपती '
सुबोधी विश्वधर्मपरिषदीं
नृप ' कर्मवीर ' अन् ' धर्मवीर ' हा भला
अति अन्ध रूढिची तोडी हा शृंखला
जगिं ' राजयोगी ' या थोर पदा लाभला
हे जगदीशा, तव पदकमलीं लीन होउनी कवी
' चिरायू हो नृपराज्ञी ', स्तवी

# मोळीवाला

(जाति—गङ्गा)

घ्या मोळी घ्याना, मोळी कावळ लई
खान्याबिन समदीं पोंर, घरिं घरत्याती तुइतुई !
समजून जरा अंतरीं
द्या पोटापुरतं तरी
म्या जरब मोलना तुम्हास सांगीतलं !
द्यायचं काय तर सांगा मंग मोल आपलं
पोटास पीळ देउन
तोडली वांकवांकुन
विसरलों पारभर भूकतान सारखा
बिनमोलानं कां नाना, मी इला होउं पारखा ?
पाटील गांवचं तुमी
लेकरूं आपलचं मी
पाठीवर मारा दोन खेटरं कसं !
पन मारुं नका पोटाला गरिबाच्या नाना असं !
ज्वारीच्या भळशा जरी
खातील ठोकुनि घरीं
मावली तिच्याहून थोर पिरथमीमधीं
दिसतो ना कोनी माला, त्या पदरीं टाका अधीं !

# शिवस्मारक पाहून—

( वृत्त—देवराज )

राजमार्ग थोर, त्यांत चौक शोभतो जिथें
अश्वरूढ, भव्य आकृती जनास पाहते

अश्वधांव दूर्गभागिं, चक्षुरोख तो पुढें
ध्यान लागले किं काय ध्येयमेरु ज्याकडे !

रोखिली समोर नीट, तीक्ष्ण दीर्घ ती असि
काळमर्दनास चालली किं नागिणी जशी

लष्करी पचंग पेहराव, पाहतां जडे
संगरांत शत्रुपाल करीत भूप कीं लढे !

भव्य चेहरा समोर, पाहलो जणूं जसा
पाहतां कुणासही करील तो प्रसन्नसा !

अश्वधांव, वीरभाव दाखवी पदांकित
वायुवेग चालला पिछाडि पुच्छ झोकित

सौख्यदायि अंबिकेस—धांव जी गडाकडे—
वंदनास चालला किं काय भूप तांतडें

श्री शिवाजिभूपती—महा चरित्रस्मारक
हो जनास सर्वकाळ कार्यदक्ष, तारक !

# बरी पडली तुमचीच त्याजहून !

( जाति–दिंडी )

रात्र अंधारी किर्र दाटलेली
दाक्तरातें कुणि हांक मारियेली

वदे दाक्तर ' या आंत, काय बोला ?
असे झाला आजार का तुम्हांला ? '

' पानचौकीला तुम्हा न्यावयाचे
म्हणुनि आलों मी वदा काय त्याचें ? '

' दोन रुपये पडतील तुम्हा खास '
' त्वरें काढा साहेब मोटरीस '

दाक्तरानें मोटार काढियेली
' वसा ' म्हणुनी भरधांव चालवीली

पानचौकीला क्षणीं थडकली ती
आणि उतरे तो धरूनि बॅग हातीं

' बरें दाक्टर, घ्या फीस, रामराम
तुम्ही केले भररात्रि छान काम ! '

' अजुनि नाहीं कांहींच कुठें रोगी ? ',
" असे रोगी कुणि आमुच्या न जागीं

बहुत अड्डे शोधिले मोटरींचे
परि न परवडले मजशिं भाव त्यांचे

म्हणत होते ' कलदार घेऊं ती ! '
बरी पडली तुमचीच त्याजहून ! "

# अशी वधू हवी !

का. क्र. १२३२

( जाति–गङ्गा )

जणुं शुक्राची चांदणी !
सडपातळ तनु-बांधणी
कुळकुळीत काळे कर्णझांक कुंतल
तुळतुळीत, झुळकीसंगे जे वळण घेति चंचल
पामीर पठारापरी
तद् विशाल भालावरी
चमकती चालतां स्वेदबिंदु मौक्तिक
गोंविलेत त्यामधुनी कीं, कमनीय कपोलालक !
भिवयांत धनुष्याकृति,
जणुं चंद्रकोर वांकती !
मृगनयनीं नीलाम्बुजी असावी छटा
कीं मदिराक्षीं झळकावा तळ तांबूस लव गोरटा !
नासिकेंत चाफेकळी,
कीं फुलें पुष्पपाकळी,
मकरंदगंधमय मंद श्वास निर्भय
हृदयांत वसे कीं काय मज भासो पद्मालय !
अधरांतहि बिम्बाधरी
तांबूस तोण्डल्यापरी
विलसती सुधेचे तुषार ओष्टांवरी
लुसलुशीत ठेवण त्यांची वरवृत्ति करो बावरी
लव हास्य नटीच्यापरी
लाजरें हांसणें जरी

खुलतातच कांहीं दंतपंक्तिच्या कळ्या
कीं हास्यांतुनि प्रसवीते ती दाळिंबीच्या बिया !
सुळकते कळस सुंदर
धरि हृदयमंदिरावर
जरि पटीं चेपले, शीग न त्यांची ढळो
नवपणांत कीं ती आली हें स्पष्ट कुणाही कळो !
चिमटली असावी कटी
कीं सिंहकटी एकटी
श्रोणींत थरकती हंसगती, कामिनी-
हमरस्तींही जातांना भासो ती गजगामिनी
कोकीळकण्ठ सुस्वर,
गायनीं जणूं शाहिर !
घरकामामाजीं चतुर महा सुगरिण
वरसेवेला ती राजी, जरि म्हणाल सारा दिन !

# प्रेमाची वाट

( जाति–लवङ्लता )

" उलटून गेले चार वार, तरि उलट न येई गाडी "
लइ आलोखीदार तुझी रऽ दिसते सासुरवाडी ! "
गणुजी तात्या वदले लावित खुंटीला पागोटं,
भिंतिस रेलुन बसला होता रघुजी चाळित बोटं,
" तवा आज तर हंसतो भारी, " वदली सगुणा मधुनी
" सगुण बेस हा, सुवासीण येईल सांजला सदनीं "
खुले तोंच दिलकळी रघूची ऐकुन जननी-बोल
मनीं गोड गुदगुल्या जाहल्या, उलले थोडे गाल
ऊन भाकरीवर लसुणाची भुगराळोनी चटणी
गहिरें ओतुन तेल, घेतली लगेच ती दुमतोनी
" आण कालचं फडकं " वदली कांदां काढित आई
" गमावलं ना नाल्यावरती, भान कुठं रऽजाई ? "
रघू न्याहरी घेऊन गेला गुरं वळाया रानीं
अंतरांत परि खेळत होती त्याची कमळाराणी

× × ×

नालदरीचा शिवार टाकुन भरगवताळ झकास
गुरं आणलीं वळवुन सगळीं वाटेच्या लगतास
नव्हतां चारा तिथं फारसा, रानच तें खडकाळ
पण अंजनचा गुरांस रघुनं दिला छाटुन डहाळ
" किती दिसापुन कमळाचा मी नव्हं पाहिला नूर,
आंबेबन हें मैनावांचुन राघूला हुरहुर !

वाट तुझी गऽबघुन सारखी सुकला माझा जीव,
सुकला नाला बरसातीला कशी येईना कींव ?"
मनांत त्यांच्या घोळत होते विचार सारे हेच
म्हणे "मुऱ्हाळी कसा दिसंना, जिवा लागली खेंच !"
तोंच कुणाचा तांगा येई रस्त्यानं भरधांव
हात देउनी पुसे "असे का मागें गाडी राव ?"
बघुन धुरकरी फडकवि हात, रघुचा उतरे नूर
नजर फेंकली दूर किलकिली उचलुन वरती ऊर,
जवळच होतं झाड वडाचं उंच वाढलं छान,
चढुनी त्यावर, रघु रस्त्यावर रोखुन बसला ध्यान
तोंच चमकला दूर फुफाटा हवेंत गिरक्या घेत
उल्हासाची उकळी उसळे रघुच्या मग हृदयांत
पडदा दिसतां लाल, तसे ते चपळ गाडिचे गोऱ्हे—
आवरती ना म्हणुन धुरकरी ठोकि असाटी 'होरे'
खात्रिच झाली, म्हणे "पत्वणी आनंदाची आली"
डगमग डगमग फांदी हलवून रघू हांसला गालीं
धापा टाकिति चढतीला ते दुडकी घेउन बैल
म्हणून धुरकरी देइ विसांवा शेल सोडूनी सैल
ओळख पटतां गुरागुरांची, फोडतात डरकाळी
माती शिगांनीं उकरोनी उधळुन घेती भाळीं
बघून दृश्य हें म्हणे धुरकरी "अरं इच्या हें काय !
गुरं आपलीं या लत्त्याला, रघू कुठं पन जाय ?"
पडदा सारून हळुंच बाजूला कमळा काढी मान
निसर्गांतलं फूल वडांगीवरलं झुकलं छान !
नितळ नूर ज्वानीचा निरखुन निवली रघुची नजर
"कलिजा माझा आज पाहुनी" म्हणे "जाहलों गार !"

सांज उतरवी रविस लावुनी लाल रेशमी दोर
घरा परतला रघु घेउनी अपुलीं सारीं ढोरं

*  *  *

घरांत शिरतां कमळा, जमल्या गांवामधल्या बाया
सासुनणंदा-नात्यानं ज्या वन्दुन घेती पाया
सासू आशीर्वाद सुनेला देई पडतां पाय
'सिता-सायतरि जाय, होय अन् पांच मुलांची आय!'
कुणी चिकारी नणंद मुरकुन कुजबुजली कान
ऐकून कमळा स्मितलज्जेनं वळवी खालीं मान
निवांत होतां, सगुणा वदली "कमु, गाळ हें पीठ
बैस चुलीला, जाउन येते चटकन मी गोठ्यांत"
कमळाचा तर थांबुन राही पीठ गाळतां हात
चुलींत गेली सहज फुंकणी प्रीतीच्या तंद्रींत
जाळ जरासा जास्त दमकुनी दुधास जाई ऊत
चालू असतां टोकर बसुनी पाणी होय घरांत

*  *  *

पुसे येउनी रघूस सगुणा "कां न दुपारीं आला?
वाट तुझी म्यां किती पाहिली घरिं भाकर खायाला!"
रघुजी होतां चारित बैलांना कुळदाचं दान
उलथुन पडली जरी टोपली, नव्हतं त्याचं ध्यान
थरकुन गंगं चित्त तयाचं झालं, उत्तर देई
"नालदोच्या दूर शिवारीं गेलों होतो आई,
परत यायां घरास म्हणजे उगीच होतो शीण
तशांत होत पुरी शिदोरी दिली तुवा बांधून"

वदले तात्या तपासीत तें जित्रापाचं गोठं
" चंद्री अपुली गाय दिसंना, रघु अन्तरली कोठें ? "
चंद्री होती फार गुणाची कधीं न खाई मार
क्षणांत शिरली आंत लोटुनी डोक्यानं ती दार

*　　　*　　　*

हंसली सगुणा घरांत येतां बघुन सुनेंचं काम
म्हणे " चुलीचं उमजत नाहीं कमू, तुला हें ठाम !
उठ बघू हा दिवा नेउनी ठेव जरा बाहेरीं "
पदर सांवरुन चटच दिवा घेउन आलीं दारीं
रघु ओट्यावर बसला होता नजर झोंकली त्यानं
पाहुन खालीं मान घातली लव लाजुन कमळानं
हंसऱ्या डोळ्यांनीं हळुं कमळा सारित असतां वात
झाली नजरानजर, उमगला सामसुमीचा बेत

# लौकिक

(वृत्त—शार्दुलविक्रीडित)

होते स्टेशन सर्व गच्च भरलें नारीनरांनी तसें
उत्कण्ठा मनिं फार होय " अजूनी गाडी न कां येतसे ! "

झाला ' सिग्नल ' तोंच, आणि निमिषी गाडी उभी राहतां—
राष्ट्राचा कुणि एक सेवक भला खालीं जरा ठेपतां

पुष्पांचे बहुमोल हार पडती त्याच्या गळ्याभोंवती
टाळ्यांचे उठती निनाद, अवघे तन्नामही गर्जती

होती मोटर, तो तिथेंत बसतां गर्दी महा लोटली
चालाया मग त्या पथीं सुलभता आली तरी कोठली !

स्त्रीयांनीं लदल्या अनेक दिसती माड्या, हवेल्या तशा
राष्ट्रप्रेम उतास ये अजि गमे या धुंद तेणें दिशा !

हातांनीं सुकुमार, त्यावर पुन्हां वर्षूनि येतां फुलें
केवीं तें मग शीर पुष्पवलयीं त्याचें दिसावें खुलें !

छायाचित्रक धांवती जलदिनें टाकीत धापा पथीं
' कॅमेरा ' तिवईवरी बसवुनी ते साधिती आकृती

* * *

झालें वर्ष पुरें, पुन्हां उतरतां त्या स्टेशनीं तो जदां
लोकांच्या करि पाहिलीं फडकतां काळीं निशाणें तदां

ज्या शीर्षावर पुष्पवृष्टी पडली होती पुरन्ध्रीकरें
त्या शीर्षावर केरसारवणचा संयोग आतां स्थिरे

होत्या ज्या स्तवनास गात युवती मागील संवत्सरीं
त्या आतां चपला करीं धरुनिया भिरकाविती त्यावरीं

होते रक्षक जाहलें युवक जे लाठ्या धरोनी करीं
ते सौधावरुनी अतां अचुकशीं देतात अंडी शिरीं

होते ऐकत जे सभेंत बसुनी त्याचें महा भाषण
आतां तेच तयास लाविति पहा दांती धराया तृण

जेथें तो रवसाळ अश्व थकतो एका रपेटींतही
ती भूमी पळतां न त्यास पुरलीं, दे ठावही ना मही

ऐसा लौकिक हा असे, भरंवसा त्याचा धरावा कुणी
राखोनीं परि शुद्ध हेतु हृदयीं कार्यें करावीं जनीं !

# सुगी

( जाति—केशवकरणी )

देवदयेनं, साल रगड हें असं कारभारिण
पाहिलं नव्हतं जल्मांतुन
एक वार ये, वाघमळीच्या वावरांत तूं जरा
पिकावर फिरव नजर गरगरा
इळसपुरीचा बघुन जोंधळा, चकित मनीं दारिका—
होशिल, येत चालला चिका
टरटरा निघाले कणिस पोगऱ्यांतुन
वर झुललं फुल्लर पिवळं हळदीहुन
जणुं किसुन फेंकलं सोनं देवाजिनं !
हिरवा, हिरवागार बैसला पाट तुझा वाणिचा,
तसा तो गहिवरला राइचा
चवळीवेली तळास खालीं खेळत फोंफावल्या
वाध्या शेंगाच्या लोंबल्या
ढासण करिती वसान, शिंपी, दवडी, किरड्ड तसा
मातला शेवराबि कांहिंसा
तुझ्या हातच्या तूरसरीवर भुंगे नादावती
खालती फडारली ती किती !
लइ वाटुन पळकांठी सरसर
रवतमाथीं माझ्या पागोट्यापोतर
टचटचांत खालुन वरती कैरी-भर
तुरळक, तुरळक अतां लागलं दिसूं कुठें पेंभट्ट
पाहते चांदरात गे पट्टं !

भरून जाइल घर गोठ्याचं, व्हातं अर्थं तसं
'सुगी' ही यंदाची भरकस
चारून रानीं बैल आजला, उद्यां दुपारांतुन
येइन पोरगीस घेउन
घटकाभर वावरांत मागं वाळ पाखरं वरं
भिरकुनी गोफण ही भिरभिर
बाजारहाट तर करावयाचा खरं!
हो, सोनवडीचा उद्यां हाटना वरं!
उभि करून गाडी येतां रस्त्यावर
सण वाजारा उरकुन, मग मी किनार ज्याची भली
आणिन तुज लुगडें इरकली

# फेरफटका

( जाति—मुद्रिका )

पाऱ्हनं, चला या, जावुं फिराया ततं
कधिंपून पाह्यली नाहीं अमुची ती बागाइत

हो जुपली गाडी उभी असे भाइर
घ्या पागोटं अन् आतां अनमान काय म्हुन बरं !

ही पवळी जोडी राव आमुची बगा
लइ चपळाई पळण्याची, नव्ह सांगत कांहीं उगा

नच खूर लावती, पळतां जमिनीवर
अन् जशी धांवे हरणांची ते घेती वाऱ्यावर

ह्या शिवार हिरवा इथुन असा आपला
त्या पल्याडच्या बाजूला जाऊनशान ठेपला

हो, दिसूं लागला बाग आपलाच ह्या
जुपल्यात आज मोटाही, कुरकुरती कैशा पहा !

ही मोसंबीची नवी लावणी बगा
धरला मोहर मिरुगाचा, फळ येईल म्होरं सगा

हीं नागपुरीं संतरीं इथं लावलीं
तीं मधलीं समदीं झाडं फळभारानं वांकलीं

हीं ल्हानग्यांनीं फुलं लावलीं बरं
लोंबती कसे पन नामी ते केळीचे लोंगर !

मिरच्यांनीं धरली अतां नवी पालवी
नियमीतशीर पाण्याची तरतूद तियेला हवी

हा इथुनतिथुन रोपला दुध्या भोपळा
लइ पीक राव हें येडं, समदाच येढतं मळा

ही येरंडाची हार, वाल त्यावरी
घरधनीण अयुची येते तोडाया शेंगा परी

हें जिवंत पानी इहिरीचं तर बगा
कधिं आटायचं नाहीं, लइ पाझर कीं दांडगा !

या, असं हतं या, बसूं झोपडीमधीं
लइ पातळ माया केली, येतात एकदां कधीं

ही चिरली नामी गोड पोपयीच खा
त्या आंबट संतर–फोडी....पन कोन मारतं हका ?

हो, चालत बोलत वाढुळ झाला लई
अन् असेल आतां झाला घरिं तयार सैंपाकही.

# राजशाही मेजवानी

( वृत्त—वागीश्वरी )

समारंभ थाटावया भोजनाचा
 तयारी पहा नेटकी ही किती !
इथें मांडिला हा महा शामियाना
 तयाची दिसे श्वेत रम्याकृती
विजेचे फुगे गुंफिले गारवेलीं
 लतामंडपाच्या तसें भोंवतीं
चकाकावया लागती लख् प्रकाशें
 कनातींवरी जे परीवर्तती,
तसें चंद्रतेजापरी श्वेत रंगी
 फुगे वेगळे द्वारस्तंभांवरी,
नभीचें जणूं घेउनी वैभवातें
 रमाया इथें पातली शर्वरी !
फुगे सान-हा तारकापुञ्ज वाटे
 तयांचा दिसे नाथ तो थोरला
सुरंगी निळीं पातळें लेवुनीया,
 रमाया उभा मेळ हा राहिला !
कुणी गारवेलीं, कुणी मंडपाच्या-
 मधें तारका या लपूं लागती
हळूं पल्लवांतूनि डोकावुनीया
 जणूं अप्सरा नेत्र मिचकाविती !
गमे मंडपीं हा लपंडाव चाले
 तयां चंद्र शोधावयालागिं ये !
अशी यामिनी लेवुनी दिव्य माला
 प्रकाशूं इथें लागली कीं स्वयें !

[stamp] 123 ...

कमानींतुनी खालती मार्गभागीं
लता कोंवळ्या लोंबवीती सरा,
गमे स्वागतालागिं सरसावती या
धरावयास हर्षें अतीथीकरां,
शिरे पुष्पपुञ्जांतुनी मंद वारा,
सुगंधी इथें दरवळे ही किती !
सुकारंज्यधारा मना रंजवीती
वरी झोंकुनीया फवाऱ्यांप्रतीं
बघा कुण्डपङ्क्ती किनारीं धरोनी
पथाचें दिसे वाढलें वैभव,
मधें काश्मिरी गालिचा अंथरीला,
पदां लागतें रेशमी मार्दव
शिरा शामियानामधें भव्य ऐशा
पहा मांडिलीं नीट मेजें किती !
वरी घातल्या चादरी शुभ्र भारी
चकाके छटा अभ्रकाची मितीं
समानान्तरीं मांडिलीं फूलपात्रें,
तसे रौप्य पेलेहि मेजांवरी
रुमालांस हे वाळुनी टोप केले
न तीं कर्दळीचीं फुलें पांढरीं
कुठें कोणत्या वाढिले रौप्य ताटीं
पदार्थास ही दाखवी पत्रिका
बहू दक्ष हे येथले कार्यकर्ते
जराही न ते होवुं देती चुका
इथें थोर विद्वान, श्रीमंत आले,
अतां भोजनालागिं ते वसती

इशारा जरा लाभतां, वादनें तीं
किती मन्द मञ्जुध्वनीं वाजती !
फिरूं लागले वाढपी, आग्रही हे
दिसे नम्रता, यांचिया मानसीं
जरा फालसा, घ्याच मुरगीपुलावा
पुसे आग्रही राहुनी पाठिशीं
करीपफ्स, पॅटीज, पेस्ट्री, समोसे,
जिलेटीन, सॅलेट, सॅन्ड्वीचही,
कुणी वाढिती चॉप, कुर्मा, परोटे,
तसें छान कस्टर्ड साधें दही
म्हणे कोणि कट्लेट् कुफ्ते, कचोरी,
खिमा फोडणीचा जरा घ्याचना
परी आवडे फार झिंगा बडोदी,
अशी गोड कल्डाकरी ती कुणा
कुणी बीरयानीच, घेती कबाबा
खलाईसवें जॅमरोलाप्रतीं
कुणी घेति खुसाहि चप्पापुडिंगा
म्हणे हे चवीचे अती लागती
अशी राजशाही महा मेजवानी
पडे पार, संतोष-वृत्ती जडे
निघे जेवतां मंडळी ती गृहाला
सवें घेउनी पुष्पगुच्छे, विडे
कवीचा परी गुच्छ कोमेजतां, त्या
बघोनी मनीं होय कष्टी अती
स्मृती गुंफुनी ठेविली ही तयाची
सुगंधी अजूनीहि ये त्याप्रतीं.

# कॉलेजराणी

( जाति–केशवकरणी )

नाजुक तरुणी, कोमल चरणीं, नव नखऱ्याची परी
चालली कॉलेजांतुन घरीं
चंद्रज्योतिचें तेज मुखावर, हजारांत फांकडी
कोवळी भरांतील कांकडी
झिरमिरित नेसली चंद्रकळा काजळी
जणुं जळीं चमकते चमचम ही मासळी !
कीं स्वर्गपरी ही अवतरली भूतळीं !!
कीं जल पिवुनी शत मोटींचें, बाग फुले काश्मिरी
डुले वा तारू हें सागरीं !!!
इच्या रुपाची मूस विधीनें कुठुन तरी मिळविली
सुंदरा सरस अशी निर्मिली
वय सोळा सतरा, नव ज्वानीच्या भरीं
भरदार गेंद विलसती हृदयमंदिरीं
काळजी जिवाला, देइ तीच माधुरी
भिजत असावी रडुनी शालू एकान्तीं सुंदरी
सांवते लाली नयनान्तरीं
चवळीची ही शेंग कोंवळी, पिवळी पिवळी तनु
फांक कीं केवड्यांतली जणूं !
लव डुलत चालते नागिण मार्गांतुनी
थरथरति डूल ते गोंडस कानांतुनी
ती नजर फेंकते खास अस्त्र मोहिनी
कंबरेंत लवतसे लव्हाळी, भासे ही किन्नरी
खेळते तरुवर कीं वल्लरी !

मोतीजाळी हिरवा झम्पर, रुळे तयाच्यावरी-
साखळी सोनेरी तिनसरी
घडिघडी पवन सारितो पदर बाजुला
रागांत धरुनि त्या झांकी वक्षःस्थला
परि सौन्दर्याचा कळस कुठें झांकला !
नयन टपोरे टवकारुनि कीं पाहि हरिण बावरी
करितसे तरुणवृत्ति हावरी
गोजिरवाण्या गोऱ्या गालीं लिंबु जणूं साखरी
रसाच्या येत चालले भरीं !
सडपातळ बांधा, रोप जणूं हा सरू !
कीं उंच वाढला देवदार हा तरू !!
कीं देवि-रतीचें आवडतें पांखरूं !!!
धन्य गणावा जो नर होईल इच्या जिवाचा धनी
काय त्या इन्द्रपुरी याहुनी !

मराठी ग्रंथ संग्रहालय
१९५२८.

# राजदरबारगीत

( जाति—धवलचन्द्रिका—कुसुमबाणमिश्र )

सुखकर हो शुभ दिन हा सदय नृपवरा
विमल यशा गात असो सतत मम गिरा ॥ धृ० ॥
भाग्यशालि भारतीय भूपती भला
थोर भाग्य आमुचें म्हणोनि लाभला
सुमती । सुकृती । नृपती ।
करि अविरत
बहुजन-हित
नृप विलसत
—कोंदणीं हिरा
निज प्रजेस उन्नतीस नेइ नृप सदा
निशिदिनिं मनिं जनहितार्थ भोगि आपदा
सकलां । अबलां । सबलां ।
विद्यामृत
मधु पाजित
अखिल रयत
—करित साक्षरा
नांदवी प्रजा प्रशान्त सौख्यसागरीं
न्यायनीतिबद्ध ती करोनि आदरीं
विपुला । कमला । सुबला ।
राज्याप्रतिं
देई अति
रक्षि नृपति
—कुलपरम्परा

आचरली राजनीति जी पितामहें
विकसविती ' नृप प्रतापसिंह ' ती स्वयें
नृपती । जगतीं । करिती ।
आदर्शित
राज्यशकट
वहु बळकट
—जेविं जंजिरा
ग्रामोद्धारास्तव नृप विपुल दे निधी
दर्शविलें नच कुणि औदार्य हें कधीं
करिती । प्रगति । किति ती ! ।
नृपतिराज्य
अरुणोदय
सुखद होय
—या बडोदरा
प्रगत रोप लावि श्री सयाजी जे भले
आणिति नृप त्यांस ऋद्धिसिद्धिचीं फलें
' सुखवी ।नृपती । राष्ट्री । '
हीच आस
हरहमेश
कवि–सुरेश
—पार्थि ईश्वरा

# मी असाच ठीक !

( जाति—मुद्रिका )

मज असें वाटतें, चढुनी जावे गिरी
परि धाप उरीं लागोनी परततों पायथ्यावरी
मज असें वाटतें, पोहुनि जावे जळ
उसळतां शिरावर लाटा होतसे जीव व्याकुळ
मज असे वाटतें, 'राबूं शेतान्तरी'
परि उन लागतां, येतो छायेंत परतुनी घरीं
मज असें वाटतें, घ्यावें ओझें शिरीं
परि तापतांच मम माथें, तें भिरकवि धरणीवरी
मज असें वाटतें, जावें रात्रीं वनीं
परि पाहुनि झुडुपालाही ये आंग भयें थरकुनी
मज असें वाटतें, जावें युद्धा रणीं
परि बघुनि बोट चिरलेलें, येतसे हृदय चरकुनी
मज असें वाटतें, मल्लच व्हावें भले
परि खुराकीच खावोनी मम पोट वाढुं लागलें
मज असें वाटतें, चाराला जागणें
परि चहास साताच्याही मम चालतसे घोरणें
मज असें वाटतें, न्हावे शीतल जलें
परि ढगांतीलही माझ्या शरिरास थेंब झोंबले
या हौशींनीं जरि मन माझें मोहिलें
शेवटीं जसा मी तैसें राहणें जगीं ठरविलें !

# गाडीवान स्त्री

( जाति—चकितहरिणी )

भरधांव चालली उधळीत गाडी घरीं
 कुण्या ही सुभग्याची सुंदरी ? ॥ धृ० ॥

लखलखा चांदणें पुनवचांद अंबरीं
करि सुधासिञ्चना नितान्त वसुधेवरीं
नळकली चांदणी जणुं त्यांतुनि भूवरीं !
 तांतडे परतली जाया निज मंदिरीं

भरभरा धांवती बैलहि वाऱ्यापरी
करि 'हां हां धाजी' मधुनिमधुनि सुंदरी
धरि तंग कासरा घट्ट उराशीं तरी
 चपदिशी ओढिते चाबुक बैलांवरी

छनछना वाजती बैलांचे घुंगुर
ही तशांत भरते आसाटी कणखर
खडखडा गाडिचा, त्यांत रातकिरकिर
 हें तुणगडफात्तर गान गमे शाहिरी !

हाणिते टोळही टाळुनि मार्गांतले
भरज्वानीचें चैतन्य तिचें चेतलें
वांकुनी पहाते खीळहि आंसांतले
 वाकतां भासते वल्लरीच कंदरीं

दिन बाजाराचा, येतां घरिं परतुनी
बाजूस सारुनी अभ्यास सौदामिनी
उडवीत फुपाटा गेली मार्गांतुनी
 क्षणभरीं ठेविलें उभें बघत भिरभिरी

लवतां न पापणी, जटाळ जाळींतुनी-
जळफळत निघोनी गेली जणुं वाघिणी !
गांवांत येउनी तपास केला झणीं
 कळलें न म्हणुनि तळमळें अजुन अंतरीं !

# भाव तेथें देव

( जाति–दिंडी )

कुणी ललना स्नानास आटपोनी
जात होती पूजेस देव-ठाणीं
हळद, कुंकू, अक्षता, बिल्व-पत्रां
करीं घेई, ती जपे राम-मंत्रा
बघुनि येती वाहन पथीं कांहीं
मधुनि मधुनी करि चालण्यांत घाई
तिजशिं लागे पायास तोंच ठेंच
रामनामाचा थांबला उवाच
हळद, कुंकू, अक्षता, फुलांसाथ-
घडे तिजशीं साष्टांग-प्रणीपात
दगड लावी जो ठेंच त्यावरी तें
पूजनाचें साहित्य दिसत होते
कष्टुनी ती परततां गृहालागीं
दुजी आली पूजना त्याच मार्गी
पाहुनी तें साहित्य सांडलेलें
गमे तेथें कुणि देव पूजियेले
म्हणुनि पूजा वाहुनी त्याच ठायीं
परत फिरली ती मागल्याच पायीं
कितीक येती पूजिती तोच देव
त्याच दगडावर बसे लोक-भाव
कीर्ति श्रवुनी कुणि येइ एक शेठ
द्रव्य भरलें घरिं ज्याचिया अलोट
नवस करितां, पावला त्यास देव
म्हणे 'देवा, तव दास मी सदैव !'
दिले बांधुनिया भव्य मंदिरास
स्थान केलें तें रोज दर्शनास

# भिकाऱ्याची कर्मकथा

( जाति—अक्रूर )

मज धर्म करी भल्या माणसा, कांहीं
मी फिरतों ठायीं ठायीं

मी कथिन तुला गोष्ट एक लाखाची,
परि ओंगळ आहे साची

वयवृद्ध पिता– ऐंशी नव्वद होता
होती तशीही माता

अन् काय करी मी त्या दोघांसाठीं
म्हातारपणाची काठी

घरिं घोडी माझ्या होती
मी तिजवर वाही पोतीं
कधिं बसुनीही फिरवी ती

होत्याच तशा सुंदर गाई तीन
किति दुधास सांगूं छान !

मग ऐक गड्या, पुढें जाहलें काय
म्हातारा स्वर्गीं जाय !

बहु शोक करी म्हातारीही मेली
मायेची होळी झाली !

लव कर्जाचें मजवर होतें ओझें
तें फुगतच गेलें व्याजें



कुंपणकळ्या

मम जीवाच्या सात्वकार करि देना
घोडी ती म्हटलें द्याना !

धडकुनी प्लेग बेताल,
फुटकेंच आमुचें भाल
काळानें नेला लाल !

जमीस घरीं शेठ घेउनी येई
दुःखावर चटका देई !

व्याजांत तिन्ही ओढुनि नेल्या गाई
ती रडली धाई धाई !

तिज होत्या त्या, जणूं पोटचीं पोरें
जें घरचें वैभव सारें

बाईल अशी लागुनिया झुरणीला
पोंचली पुढें स्वर्गाला

संसार असा जळुनी होतां खांक
दुःखानें फोडी हांक !

जग झालें मज ओसाड
मम देहाचें हें खोड

करि पूर्वजन्मिची फेड
गाळोनि टिपें नजर जाहली मन्द

आतां तर अगदीं अन्ध !
घरदाराचा शेठच घेई ताबा,

मी भिक्षा मागत वीत्रां
ही पोटाची खळगी भरण्यासाठीं
हिंडतों सारखा वाटीं

मम आले हे चालुनि कण्ठीं प्राण
मज उरला नाहीं त्राण

हें शेवटचे दिवस कण्ठणें शहरीं
जड जातें मजला भारी

दे, काय गड्या द्यायाचें !
मज दोन घरें फिरण्याचें
तुकडे न अजुनि कोणाचे

मी दोन तुझ्या घरचे खावुनि घांस
लव शान्तवीन जीवास !

# गौरव-गीत

( जाति-अवनी )

धन्य ! धन्य ! विबुधमान्य नृपति-श्री सयाजी
अखिल जगिं सुकीर्ति-गन्ध पसरे हा आजीं ॥ धृ० ॥
निरखुनि नप विविध कला
प्रगतनीय ज्या सकला
जाणुनि मनु पालटला
— जनहितार्थ योजी
नीतिवान धर्मराज गमत न्यायदानीं
जनतेचें सौख्य तेंच निज सुखास मानी
कर्ण भूप कीं उदार
भोजच साहित्यकार
वाहि शिरीं राज्यभार
— जणुं अशोक गाजी !
भूषवी निज प्रजेस विद्यालंकारें
प्रगत करुनि सुखवी तिज उन्नतीय द्वारें
राज्यांतुनि ग्रंथालय
करिती अज्ञान लय
पाजिति जणुं ज्ञानपय
— कामधेनु या जी
अन्ध रूढि – जीर्ण वृक्ष उन्मळोनि टाकी
संगम मग हृदयंगम नव-जुन्यांत देखी
' चक्रवर्ति भूपति ' हा
भारत संस्कृती महा

संजीवन करुनि अहा !
— आणि तिज सुतेजी
अग्रेसर ‘ विश्वधर्म परिषदीं ’ सयाजी
दावी नव विश्वधर्म, होति सर्व राजी
मथुनि भिन्न धर्मसिन्धु
सत्यधर्मामृत–बिन्दु
देई जना, म्हणति वन्दु
— ज्यास सर्व आजीं
दूर करुनि जातिभेद, हरिजनास तारी
सुकृती ही होय लोकिं वन्दनीय भारी
नृप दीनांचा दिलीप
चुकल्यांना ज्ञानदीप
जगिं विद्वानांत भूप
— मुकुटमणि विराजी
‘ धर्मवीर ’ ‘ कर्मवीर ’ खचित ‘ राजयोगी ’
गौरविती पदव्या या एक नृपालागीं
होवो नृप चिरंजीव
वसतो मनिं हाच भाव
हांको ही राज्यनाव
— रतुनि सुखामाजीं !

# तळमळ

( जाति—सूर्यकला )

गाय गेलि हरपून, सोनुली गाय गेलि हरपून
गोठ्यावर हें तिचं वासरूं किलवाणं कधिंपून ! ॥ धृ० ॥
हंबरतं हें बघुनी गाई
असेल त्यांतच अपुली आई
सुटुनी जाया करतं घाई
मनिं कालवतं निरखून—सोनुली०
ठेवि जलाची थाळी भरुन
हुंगुनि परि तें करि वर मान
राहि श्रवन टवकारुनि कान
येलसे अंग थरकून—सोनुली०
कोमजलें हें फुलपांखरूं
बघुनी हृदयीं टुचति गोखरूं
धरी न चारा मुखीं वासरूं
तिज शोधुं कुठें तरकून ?—सोनुली
कशी दयेची करूं सांवली ?
गेली सोडुनि यास माउली
पाण्याविण ही वेल चालली
कशि कायमची करपून !—सोनुली०
दैना याच्या बघुनी पुढती
काळीजाचं पाणी करिती
पडो माझिया डोक्यावरती
चट अभाळ हें गिरकून—सोनुली०

# शेत्याची शीळ

( जाति—लीलारति )

हें सोनवडी वावर
　　　पिकाया सर जी
करि गोड नाद खळखळ
　　　बांध-ओहळ जी
चिरतात मासळ्या जळ
　　　त्यांत सळसळ जी
या निजामशाहीभर
　　　झाडि किरकिर जी
तरु मोहाचे भलभले
　　　गाळिती फुलें जी
हंगामीं रात्रंदिन
　　　इथं राबणं जी
आगटी, झोपडीपुढें
　　　जळति लाकडें जी
वाघऱ्या करी गुर्गर
　　　पायथ्यावर जी
भिलवडा लांब बाजुला
　　　करि गलबला जी
कोहीड पहाडी गळा
　　　काढि मोकळा जी
गाजतो अक्षि हंबर
　　　न कांहीं डर जी।
टेकडी, देउळ वर
　　　बगा सुंदर जी

कळसास झाडतो निळ्या
निंब, डाहळ्या जी
अम्बाई किरपा करी
अंत्रदा खरी
हा हिरवा शाळू दिला
तिनं कोंवळा जी
ही टंच बाजरी तशी
जशा कानसी जी
हीं तुरींत भरुनी दिलीं
लाल पोवळीं जी
ती कणसं मक्की धरी
कडेखांदरीं जी
तळपतो तियेचा तुरा
उडे भुरभुरा जी
येइना अजुन माळण
तळमळें मन जी
भय रागाचं लइ तिला
पहातां मला जी
चळचळा लव्हाळी जळीं
कांपते मुळीं जी
मग कशास रागें भरुं
अबोला धरुं जी !
कानाला चाहुल कळे
पीक सळसळें जी
टोपलींत लोटा, वर–
दिसे भाकर जी
पिरतीची मोहनकळी
जवळ पातली जी

# विरही

( जाति–बालमुकुन्द )

कधिं भेटशील तूं मजशीं सखये तरी !
मधुर हांसरी, अमळ लाजरी लज्जालतिकेपरी ॥ धृ० ॥

मज मोहुनि तूं लाविली प्रेमलालसा
मम करुनि घेतला हृत्प्रान्तहि खालसा
उमटवुनि तयावर मधुभाषेचा ठसा
निशिंदिनीं लागली तव तंद्री अन्तरीं–कधिं०

एकान्तीं पाहुनि करितां मज वाचन
मंडळी घरांतिल यावे तूं टाळुन
हळुं बुकांत फेकुनि सुम, ध्यावे मीलन
त्या सहवासाची मिळेल कधिं माधुरी !–कधिं०

कधिं उभी राहशी स्वप्नीं मम संनिध
हृत्पद्म वाहुनी करिशी मज सावध
गुजगोष्टी कथिशीं प्रणयें नानाविध
परि जागतांच, लोटिशीं विरहकन्दरीं–कधिं०

तव वाणी, मजशीं पक्वान्नें मधुरसीं
तव कपोल, मम कोटास फूल गुलमशी
तव गौर दंड, ती मज किनखाबी उशी
या चिजा केधवां परतुनि येतिल घरीं !–कधिं०

किति कवनें रचिलीं तुझिया प्रीतिस्तव !
मांडिला तयांचा एकसारखा स्तव
तव ध्यासाचा धगधगे अधिक विस्तव
उरिं रुते विषारी विरहाची ही सुरी—कधिं०

अङ्कूर जिवाचा तुजपाशीं जो वसे
जो सौख्यकन्द दोघांस सारखा असे
नच कुशल कळविलें त्याचेंही राजसे
मम जीव जाहला वारा प्याल्यापरी !—कधिं०

# गोड आचंबा

( छन्द—जीवनलहरी )

राहूनी तो उभा
न्याहळी पिकास
फुटलें कोंवळें
फुल्लर झकास !
वायुची झुळूक
डुलवी कणसें
नाचती त्यांवर
वेलींचे वळसे
आनंदे पांखरें
करिती गलबला,
अंगाई गातात
कणसांच्या मुला !
पसरली छान
जरतारी पैठणी
पाहुनी म्हणे तो
'यंदा आबादानी !'
जपे जीवापाड
सालाची पैदास
तयाची त्यावर
जीवनाची आस
कमाईचा करी
अंदाज अन्तरीं

'उजळून टाकूं'
म्हणे 'यंदा पोरी'
'उजळून टाकूं'
म्हणे 'यंदा पोरी'
हर्षांत या सोडी
गोफण भिरीरीं
इतक्यांत गेली
चढुनी भिंवई
फेंकली नजर
दूर ती विस्मयीं !
खालील बांधास
तुरीच्या सरींत
शिरून कुणीसें
शेंगा ओरपीत
पाहुनी दृश्य हें
ठोकली आसाटी
जमल्या कपाळीं
नागमोडी आटी
चोखंदळ एक
रांगडी बोलींत
हंसडली शिवी
चालत चालत;
जरी ती ललकारी
घुमवी शिवार
कुणीसें परी तें
तिथें राहि स्थीर

रागाच्या तारांत
        उपटला तोटा
निपसून पानें
        बनविला सोटा,
नव्हतें दोघांत
        अन्तर कासरा,
तोंच त्यास दिसे
        चेहरा हांसरा !
आले बोल कानीं
        प्रीतिचे अमोल,
‘ झाला कां इतुकें
        राया, घामाझोल ? ’
तोही मग म्हणे
        ‘ माझी ग मालण,
उन्हांत तान्हांत
        कशाला ग येणें ? ’

# मधुवञ्चना

( जाति—धवलचन्द्रिका )

सोड सोड नेत्र सखे, लागल्या कळा
चमकतात काजवे नि होति अवकळा ॥ धृ० ॥
रोज येशि टाकित तूं चोर पाउलें
हास्य रोखुनी मुखांत, झोंकिशी फुलें
ओढुनी पिनाहि केस करिशि मोकळे
तीळ न मज तव रुचे स्वभाव आगळा
मस्करींत कुस्करशी स्कंधही कधीं
हातामधिं हात धरुनि फिरविशी मुदी
रागवतां हांसते ग तूंच फिदफिदी
चाळा तरि कोठुनि शिकलीस हा खुळा ?
होते मी भरत रंग छान गायना
दिलरुब्यास माझिया ग, काल तूंच ना
पिळुनि सैल खीळ, केलि तार भनभना
अधिक किती, तरि अजुनी बहर कोंवळा !
फिरतांना, कधिं न पथीं नीट चालतां—
तीन जागिं वांकविशी सरळ तनुलता
दिसले तुज जर का ते, लवहि ना भितां—
दर्शविशी हळुं तिकडे फुंकुनी शिळा
बंदिवान नेत्र तिचे जाहले खुले
तळव्यांनीं वरखालीं खूप चोळिले
झरक्यानें चंद्रानन जलद वळविलें
ओलावुनि गाल तिनें परत घेतला.

# दोन आळशी

( जाति—अक्रूरलीलारति )

३।४ ३२३

कुणि एक आळशी मार्गीं चालत असतां
तों दुजा मिळाला समोर हळुंहळुं येतां
पाहुनी जाहला परस्परां आनंद
क्षण तयां वाटलें चाखित गुलकंद !
ते उभे राहूनी तिथेंच भररस्त्यांत
जावया प्रवासा करूं लागले बेत

तों वदे एक " चल जाऊं काशीपुरीं
कुणि जरी सांगती गंगा येथुनि दुरीं
परि अश्व आपुले चपळहि वाऱ्यापरि "

ठरविलें जायचे ' उद्यां ' म्हणुनिया त्यांनी
परि भेट जाहली पुन्हां आठ दिवसांनीं
दिलगिरी दाविती परस्परां देखुन
दिन निघुनी गेले म्हणति ' न उरलें भान '
कुणि तोंच आणिले अबलक घोडे दोन
बसविलें तयांना लगाम करीं देवून
दोघेहि चालले गांवनद्या टाकीत
चाबुक ठेविले तसेच ते हातांत

भरसांज जाहली तयांस रस्त्यावरी
लुकलुके दिवा कुठलाला सांनिध जरी
जतां न तिथें, उतरले नदीच्या तिरी

जरि जवळच होता तरु आंब्याचा हिरवा
बोरीचा बुन्धा तयां वाटला बरवा
खाउनी शिदोरी मुख उष्टें ठेवोनी
झोपले पथाऱ्या तशाच घेउनि मानीं
झाडांचीं कोठें धुंडावीं तरि खोडें
पायांस घेतले सैल बांधुनीं घोडे
एकाच्या छातीवरती टपके बोर
जाहला मनीं संतोष तयाच्या फार

तो वदे तुजाला " ऊठ गड्या झडकरी
मज बोर वाटते पडलें वृक्षावरी
तें उचलुनि ठेवी मम ओठांवरी तरी "

परि दुजा वदे " मम ओठ चांटतें श्वान
नच ' हाड ' म्हणे मी, तुझें ऐकतो कोण ! "

# तानाजीचा संताप

( जाति—रसना )

यशवन्ति, आज कां गे फिरलीस सांग मागें ?
उतरे रुधीर नेत्रीं तुजला बघोनि रागें
साह्यें तुझ्याच ना गे, जिंकिले किती मी !
स्मरते परी न मातें, तुज देखिलें त्रिगामी
तुज सांग काय कळला मम दैवयोग भावी
विपरीत आज ऐशी म्हणुनी कृती घडावी ?
दिपलेत नेत्र तूझे, तुटतां नभांत तारा
कळतो न अर्थ याचा, तरि सांग गोत्रद्वारा !
खंबीर तूं दिलाची मैत्रीण मन्मनाची
कथिशी न कांसया गे, मज गोष्ट तूं जिवाची ?
विजयें गडाशी जातां—येतां पुढें जिजाई
किती चुंबुनीं तुला मी, तव गाइली बढाई !
कुरवाळुनी नखें हीं, तैंशीच शेपटी ही
कवटाळिलें तुला मी वक्षःस्थलावरीही
चट्चद् जिभें तदां तूं मम चाटतांच हात
शाबासकी दिली मी तव थोपटोनि पाठ
बुरजावरोनि बघतां भगवा नभांत झेण्डा
किती नाचलों तुझा मी धरुनी शिरीं करंडा !
स्मर त्या कृतज्ञतेला, स्मर हा कराळ काळ
' वर रोवि जा नखाग्रें ' सरताच हा सवाल;
परि याद राख, आली जर का पुन्हां धरेशी
तुकडे करोनि तूझे खाईन भाकरीशीं !

# मागणी

मांगनं उनं तारिले,
सांग मंग देस अठ्यें का तिलें ? ॥ धृ० ॥

से घरना मोठा सुखी खाइपीसन
नहिं देनंलेनं डोकावर मनमन
से नवाजेल या भर ताल्लुकामन
'पडनार वान नहिं राइ' म्हने 'बाबिले'

घर कडीपाटनं, वर चुनगच्ची जिना
है न्हात घर. अन् सेतस गोठा पुना
से वतनदार पाटील म्हने काळिना
नहिं छाती कोनी नांव ठिई कूळले

से गांवकूसले हेरमळा न्यामिना
चालतीस मोटा रोज तिन्हीं सांजना !
या साले लावा म्हने बाग केळिना
घरबसलें चाली उना सगा आपले

बहु आलोखीना उना कधीं पाव्हना
नहिं निंघू देस तो त्येले चाहाविना
है बरं सगंपन येस ध्यानमन मना
जर पटत हुई हा सल्ला मनमा तुले

आंडोर एकला पूना सात नवसना
से देखलपनमा गोरासा तोण्डना
इरपीनसारखा उच्चासा हाडना
आत्तेसें चमकस मिसुर जसी ओठले

वग नसिबभागले भेटनीच चांगनी
व्व, पोर नांव ली जव्हयतव्हय आपनी
जर उपटाई खडकले कधीं धडकनी—
ती अक्षी अपना रडी मंग नांवले

# अभयदान

( जाति—स्नेहसागर )

कशास धांदल ! कशास ही पळ ! ! असेंच अम्हावरी
नृपाळा, राज्य सुखाने करी !
ही अफाट भूमी त्रिकोणशी पसरली
चाळीस कोट दुनियेनें ओथंबली
जणुं मेंढरेंच परकोटांतुनि कोंडली !
पाळूनि त्यांच्या घेत असावे कांतरुनी लोंकरी
नृपाळा, राज्य सुखानें करी !
अज्ञानी जन असंख्य जोंवरिं कळे न जग काय तें ?
जयांना मिळति न पुरतीं शितें
जोंवरीं राहतिल निर्बल ते सांपळे
जोंवरी कांपतिल आपसांत ते गळे
निज नावेचे उपटुनी फेंकातिल खिळे
धरि न तोंवरी भीति अन्तरीं, जाण खरी वैखरी
नृपाळा, राज्य सुखानें करी !
सुभाग्य म्हणुनी, भिन्न जातिमय भूमिखण्ड लाभला
गमे ही पुण्याई ये फळा !
सोडी न धीर, बहु पक्ष इथें जोंवरीं
कक्कूट, काक, पिंगळा, गृध्र, लाव्हरी
जमणार जूट का कधिं यांची ती तरी ?
कधिं एकाला, कधीं दुजाला, दावूनि दाणे करीं
नृपाळा, राज्य सुखानें करी !

# गुर्जरसूर्यास्त

( शिखरिणी )

‘ घडे श्रीमंतांचें निधन ! ’ कटु ही तार असली–
पथीं दुर्वार्तेचें वहन करितां कां न कचली ?
न झाले किंवा कां श्रवण करितां कर्ण बधिर,
न व्हावे कैसे ते शिथिल कथकाचेहि अधर !

( वसंततिलका )

सूर्यास्त काय आजि होउनि गुर्जराचा
चोहींकडे पसरला पट हा तमाचा !
भूकंप होय अथवा पवि-पात काय
सन्मार्ग दाविल अतां तरि कोण हाय !

( शार्दूलविक्रीडित )

ज्याचा मंगल कीर्तिगंध भुवनीं ‘ राजर्षि ’ ज्या बोलती
ज्याची संस्कृति भारतीय, ठरली आदर्श सर्वांप्रतीं
ज्यानें सद्वचनें दिल्या परिषदा आंदोलुनी त्या किती
झाला जो प्रिय कीं हिराच किरिटीं विद्वज्जनांना अति !

योजी भिन्न कला प्रयुक्त सकला, जो दे प्रजेतें बला
विद्यासंगतिला गजान्त कमला जो सेववी या स्थला
कौशल्यें विपुला करी प्रगतिला राजा सयाजी भला
सोडोनी विभवा दिवंगत कसा झाला ? कळेना मला !

( द्रुतविलंबित )

नृपतिच्या विरहें जन विव्हळे
विधि कठोर किती तरि ना कळे !
सकल हें पुर भासत पाण्डुर
उपवनें दिसती अजि भेसुर !

( मंदारमाला )

स्मशाना निघे जावया थोर यात्रा
महालांतुनी जेधवां हाय ती !
दिसे राजवाडा उदासीन मागें
मनोरे जणूं आंसवें ढाळिती !
वदे मार्गही, "या पुढें हाय राया,
न लाभावयाचीं तुझीं पावलें"
अहा, हें असें पाहुनी दृश्य, माझें--
द्रवें चित्त, पाणी हृदीं जाहलें !

( द्रुतविलंबित )

नृपसमागमलाभ न तो पुनः
म्हणुनिया वळले जन दर्शना
सुमनहार शवा कुणि वाहती
सहज अश्रु नयनांतुनि लोटती

( भुजंगप्रयात् )

पुढें पालखी मागुती लोकभार
जणूं काय चाले पथीं शोकपूर !

किनारीं उभ्या योषिता शोकग्रस्त
पहायास दुर्दैवलीला तटस्थ !
महा शोकसिन्धूच येतां स्मशान
मनें ओस झालीं सहारासमान
जदां होति तोफा नभीं नाद दाटे
धरा हुंदके दे वियोगेंच वाटे !
चिता चंदनाची जशी पेट घेई
तसा अन्तरीं वाढता दाह होई
सुखें लाभलीं ज्या गुणांनीं अमीत
स्मृती राहि त्यांची अजीं दुःख देत !

(अनुष्टुभ्)

ईशा, माझी पादपद्मीं आशा ऐसी वसे तव
"नृपात्म्यानें शान्ति लाभो, होवो स्वर्गींहि गौरव !"

REFBK-0019528
REFBK-0019528
दा. क्र. १९५२८